# प्रकरण तिसरे

# 'अश्वदा' कादंबरीचे अंतरंग

# प्रकरण तिसरे

## 'अश्वदा' या कादंबरीचे अंतरंग

कादंबरी हा कथात्मक वाङ्मयप्रकार असल्याने त्यात निवेदनाला प्राधान्य असते. तिचे घटक व प्रकारही अनेक आहेत. लेखकाच्या जीवनविषयक चिंतनाचा आविष्कार करायला कादंबरीत विशालपट उपलब्ध असतो. त्यानुसार तो भाष्यही करू शकतो. प्रसंगानुरूप आपल्या क्रिया प्रतिक्रिया नोंदवायला त्याला त्यात अवधीही मिळतो. कादंबरी म्हणजे कादंबरीकाराचा अभ्यास, चिंतन आणि जीवन विषयक जाणिवेची प्रगल्भता याचाच आविष्कार असतो. पण या आविष्काराला नाटक ह्या वाङ्मयप्रकाराच्या माध्यमात मर्यादा पडतात. वाङ्मयीन संहितेला त्यात महत्त्वाचे स्थान असते. जगभरात महत्त्वाचे स्थान असलेल्या पुराणकथांनी नाटककार शॉ, कादंबरीकार जॉईस आणि एलियट सारख्या कवीला आकर्षून घेतले. याबाबत मुख्यत्वे भारतात आणि मराठीमध्ये पुराणप्रियता आढळते. पुराण कथांमधून व्यक्त होणाऱ्या मानवी जीवनाला नवीन अर्थ देऊन त्यातील जीवनमूल्यांचे चित्रण करण्याचे काम पौराणिक कादंबरी करते.

### 'अश्वदा' कादंबरीविषयी

'अश्वदा' ही संध्या देशपाडे यांची २००६ साली प्रकाशित झालेली कादंबरी आहे. 'अश्वदा' ही पौराणिक कादंबरी आहे. महाभारतातला प्रसिद्ध सम्राट 'ययाती' हा सर्वांना परिचयाचा आहे. वि.स. खांडेकरांनी त्याच्या जीवनावर 'ययाती' ही कादंबरी लिहिली व तिला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. याच ययाती महाराजांची कन्या 'माधवी' हा 'अश्वदा' या कादंबरीचा विषय आहे. या कादंबरीमध्ये ययातीकन्या माधवीच्या जीवनातील प्रसंग, तिच्यावरील अन्याय, व्यथा-वेदना, तिची होणारी घुसमट त्याचबरोबर तत्कालीन जीवनाचे दर्शन, वसिष्ठ व विश्वामित्र यांच्यातील संघर्ष, गालव व विश्वामित्र गुरू-शिष्य संबंध इ. कादंबरीतून चित्रित केला आहे.

ययातीकन्या 'माधवी' वरती आधारीत १९९३ साली एक कादंबरी लिहिण्यात आली आहे. ''ही कादंबरी विजया जहागीरदार यांनी 'ययातीकन्या माधवी' या नावाने लिहिली. अनेक अघटितांनी भरलेल्या माधवीची कथा यात सांगितली आहे. माधवी ही ययाती-देवयानीची कन्या ! एका युवतीला बांधून टाकणाऱ्या रूढी, परंपरांचे, धर्मपाशाचे दर्शन यात घडते. या सर्वांमुळे तिला होणाऱ्या यातना, मनस्ताप, झालेली अपकीर्ती, मिळालेली दूषणे इत्यादी गोष्टी दिसतात. वाचकाला विचार करायला लावतात, अंतर्मुख करतात.''[१]

'अश्वदा' कादंबरीविषयी डॉ. मंगला आठलेकर म्हणतात, ''आपल्या आयुष्यात घडलेल्या प्रचंड अकल्पीय उलथापालथीला सामोरे जात असताना एक स्त्री म्हणून माधवीच्या मनात भावनांचे आणि वासनांचेही जे कल्लोळ निर्माण होतात तो या कादंबरीचा गाभा आहे.''[२]

## 'अश्वदा' कादंबरीचा आशय (कथानक)

हा कादंबरीचा मुख्य गाभा असतो. कथानकात आरंभ, मध्य, अंत असतो. कथानकाच्या माध्यमातून विषय मांडला जात असतो. कथानकात सुसंघटितपणा, संभवनीयता, मौलिकता हे महत्त्वाचे गुण असतात. कथानक याचा अर्थ कादंबरीतील व्यक्तींची विशिष्ट सामाजिक वातावरणात घडलेली स्थिती होय. ॲरिस्टॉटल कथानकाला कथेचा आत्मा मानतो. कथानकात उपकथानकालाही महत्त्व असते. कथानक आणि उपकथानक या दोघांच्या गुंफणीतून आकर्षक कथा निर्माण होते. या संदर्भात प्रा. गंगाधर गाडगीळ म्हणतात, ''कादंबरीची रचना संघराज्याच्या घटनेसारखी आहे. कादंबरीत अनेक केंद्रे असतात. स्वतंत्रपणे विकास पावणारी कथाबीजे असतात. वेगवेगळ्या घटकातून रचलेल्या स्वायत्त संघटना असतात. त्या संघटनांचा परस्परसंबंध असतो. पुष्कळदा तिच्यातील कथासुत्रे परस्परांच्या प्रगतीला मदत करतात. कोणत्याही कादंबरीतील या

स्वायत्त अनुभव संघटनांचा परस्पर संबंध मात्र निश्चित असतो. तसे नसेल तर या संघटना कादंबरीत येणे अर्थशून्य असते.''[३] यावरून कथानक, उपकथानक यांचे परस्पर संबंध स्पष्ट होतात.

कान्यकुब्जचा राजा गाधीनरेश याला विश्वरथ व सत्यवती ही दोन संताने होती. गाधीनरेशाला अश्वमेधी अश्वांचे फार वेड होते. गाधीराजांना अश्वविधेवर चर्चा करण्यास आवडत असे. और्याकडून धनुर्विद्या आणि कोसल नरेश त्रिधन्वा यांच्याकडून अश्वविद्या संपादन करून कोसल देशाहून ऋचिक नावाचा एक युवक कान्यकुब्जमध्ये आला होता. गाधीराजांना अश्वविद्येवर चर्चा करण्यास आवडत असल्यामुळे ऋचिकही या चर्चेत सहभाग घेत होता व या चर्चेमध्ये गाधीकन्या सत्यवतीदेखील असे. सत्यवती व ऋचिक यांच्यामध्ये प्रेमसंबंध होते. त्यांचा विवाह व्हावा असे त्या दोघांना वाटत होते. गाधीराज व विश्वरथालाही ऋचिक आवडला होता. त्याची काम करण्याची पद्धत, त्याचा धाडसीपणा, त्याचे लाघवी बोलणे हे त्यांना आवडत असे. मात्र 'मौल्यवान वस्तूंची जपणूक करण्यासाठीही काही ताकद असावी लागते. तुझ्याकडे ती आहे हे तुला सिद्ध करावे लागेल,' अशी गाधीराजांनी ऋचिकाला अट घातली. ही अट पूर्ण करण्यासाठी ऋचिक कान्यकुब्ज सोडून गेला व काही दिवसांनी परत आला. तो कान्यकुब्जला परतला तो एखाद्या राजकुमारासारखा बरोबर असंख्य पांढरेशुभ्र, श्यामकर्णी, अश्वमेधी अश्व घेऊन आला होता. या अश्वांच्या बदल्यात गाधीराजांनी आपल्या कन्येचा विवाह ऋचिकाशी लावून दिला. सत्यवतीचा हा विवाह अख्ख्या आर्यावर्तात गाजला.

गाधीराजांच्या मृत्यूनंतर सर्व जबाबदारी विश्वरथावर येऊन पडली होती. ऋचिकाने दिलेल्या असंख्य अश्वांची देखभाल करून त्यांच्या शक्तीचा उपयोग करून, त्यातून उत्तम अश्वदल त्याने निर्माण केले. त्याच्या नावाचा दबदबा आजूबाजूच्या राज्यांत निर्माण झाला होता. रेणू, शीलवती, सांस्कृती अशा कितीतरी स्त्रिया त्याच्या राणीवशात होत्या.

एवढे सगळे असूनही विश्वरथ मात्र समाधानी नव्हता. कंटाळून तो एकदा शिकारीला गेला. येताना खूप अंधार झाला म्हणून वसिष्ठांच्या आश्रमात एक रात्र काढण्याचे ठरविले. वसिष्ठांनी राजा, मंत्री व सर्व सेनेचे आदरातिथ्य केले. विश्वामित्र आश्चर्यचकित झाले की वनात एवढ्या लोकांच्या उत्कृष्ट भोजनाची व्यवस्था वसिष्ठ कसे करत असतील. वसिष्ठांच्या आश्रमात प्रयोगशाळा होती. मात्र ती पाहण्यास वसिष्ठांनी मनाई केली. आश्रमातून बाहेर पडल्यानंतर त्याने आपल्या सैन्याला झाडीत लपून वसिष्ठांच्या शिष्यांवर लक्ष ठेवण्यास सांगितले. तेथील बी-बियाणे विकत घेऊन उत्तम प्रतीच्या धनधान्याची निर्मिती केली. त्यामुळे वसिष्ठांशी त्याचे संबंध बिघडले व त्यांच्यात वारंवार संघर्ष होऊ लागला. याचा विश्वरथाला पश्चाताप झाला व त्याने ब्रह्मर्षी होण्याचे ठरविले. त्यासाठी कोणालाही न सांगता विश्वरथाने कान्यकुब्ज सोडले.

विश्वरथाने तपश्चर्येला जाताना अयोध्येत आपला पुत्र गालव व पत्नी शीलवती यांना सोडले होते. तपश्चर्या पूर्ण झाल्यानंतर शीलवती व गालव भेटतील यासाठी तो अयोध्येत परतला. त्यावेळी वसिष्ठांशी त्याची भेट झाली. वसिष्ठांनी अयोध्येचा राजा सत्यव्रत याला स्त्रीचे अपहरण केल्याबद्दल दोषी ठरवून हद्दपार केले होते व सत्यव्रताच्या वडिलांना तपश्चर्येला पाठविले होते. विश्वामित्रांनी वसिष्ठांशी वैर घेऊन त्या पिता-पुत्रांना न्याय मिळवून दिला. सत्यव्रताला त्याचे राज्य परत मिळवून देऊन विश्वरथ तपश्चर्येला गेला.

राज्याभिषेक झाल्यानंतर सत्यव्रताने एक यज्ञ करावयाचा ठरवला होता. यासाठी वसिष्ठ व विश्वामित्र यांना आमंत्रित केले होते. विश्वरथाच्या हाती यज्ञाचे अध्वर्यूपद दिले होते. मात्र वसिष्ठांना ते मान्य नव्हते. तपश्चर्या करून प्राप्त झालेले ज्ञान विश्वरथाने सभेतील लोकांसमोर मांडले. त्याचे भाषण ऐकून सर्व सभा व सत्यव्रत भारावून गेला होता. सत्यव्रत विश्वरथाला म्हणाला तुम्ही नुसते ब्रह्मर्षी नाहीतर विश्वामित्र आहात व या

विश्वरथाचा विश्वामित्र झाला. सत्यव्रताच्या मृत्युनंतर राजा हरिश्चंद्र हे अयोध्येचे सत्ताधीश बनले होते. एकदा राजा हरिश्चंद्र हे खूप आजारी पडले होते. त्यांना बरे वाटण्यासाठी वसिष्ठांनी एक यज्ञ करायचा ठरविला होता. त्यासाठी शुन:शेप नावाच्या ब्राह्मणपुत्राला विकत घेऊन त्याचा बळी देण्याचे ठरविले होते. विश्वरथाने पुन्हा एकदा वसिष्ठांशी वैर घेऊन या यज्ञाला विरोध केला व शुन:शेपाचे प्राण वाचवून त्याला आपल्या ज्येष्ठ पुत्राचे स्थान दिले. या विश्वामित्रांच्या जीवनात अनेक प्रकारचे संघर्ष चालू होते. त्यामुळे त्यांनी राज्यत्याग करून आश्रमात उर्वरित आयुष्य घालवण्याचे ठरविले.

विश्वामित्रांचा आश्रम ताटकवनाजवळ होता. या आश्रमात विद्या आत्मसात करण्यासाठी अनेक शिष्य येत असत. महाभारतामध्ये विश्वामित्रांचा शिष्य गालव याचे आख्यान येते. गालव हा विश्वामित्रांचा अतिशय आवडता शिष्य होता. गालव हा अतिशय हुशार व बुद्धिमान होता. विद्याभ्यास पूर्ण झाल्यानंतर आश्रम सोडून जाण्याची प्रथा होती. गालवाचाही विद्याभ्यास पूर्ण झाला होता व त्यासाठी आश्रम सोडून त्याला जावे लागणार होते. आश्रम सोडून जाताना गुरूदक्षिणा देण्याची पद्धत होती. सर्व शिष्य विश्वामित्रांना गुरूदक्षिणा देत होते. गालवाच्या कामावर गुरूदेव प्रसन्न होते. त्यामुळे गालवाकडून गुरूदक्षिणा न घेण्याचे विश्वामित्रांनी ठरविले होते. मात्र गुरूदक्षिणा घेण्यासाठी गालव विश्वामित्रांना आग्रह करतो. तेव्हा त्याच्यावर विश्वामित्र भयंकर संतापतात. गालवाला 'आठशे अश्वमेधी अश्व' ही गुरूदक्षिणा मागतात. या मागणीने गालव चिंताग्रस्त होतो व विष्णूची आराधना करतो. विष्णू गालवाच्या मदतीसाठी गरूडाला पाठवितो. गरूड गालवाला सर्व दिशांची माहिती सांगतो व गालवाला प्रतिष्ठानच्या ययाती महाराजांकडे आणून सोडतो.

गालव आपली याचना घेऊन प्रतिष्ठानच्या राजाच्या दरबारात जातो व त्यांच्याकडे 'आठशे अश्वमेधी अश्वांची' मागणी करतो. मात्र ययाती महाराज त्याची मागणी पूर्ण करू

शकत नाहीत. याचकाला रिक्त हस्ताने पाठविले याची चर्चा सर्वत्र होईल व प्रतिष्ठानची प्रतिष्ठा धुळीस मिळेल यामुळे ययाति महाराज चिंताग्रस्त झाले होते. ययाति महाराजांची कन्या माधवी ही अतिशय सुंदर अशी राजकन्या होती. पुत्रप्राप्ती नंतरही कौमार्य तसेच राहील हे वरदान तिला ब्रह्मर्षींनी दिले होते. त्याचबरोबर तिला होणारा पुत्र चक्रवर्ती सम्राट बनणार होता. ययातीने आपली कन्या दानात अर्पण करायचे ठरविले. यापूर्वीही त्याने आपल्या स्वार्थासाठी आपला पुत्र पुरू याचे तारूण्य मागितले होते. प्रतिष्ठानच्या परंपरेला न शोभणारे कृत्य त्याच्या हातून घडत होते. माधवीचा दान-समारंभ हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला होता. समारंभ पाहण्यासाठी असंख्य लोक जमा झाले होते. कोणी महाराजांच्या दातृत्वाचे गोडवे गात होते तर कोणी माधवीची कीव करत होते.

प्रस्थानासाठी गालवाने मध्यान्ह मुहूर्त काढला होता. भर उन्हातही असंख्य लोक माधवीला निरोप देण्यासाठी येतात. मैत्रिणी, दास, दासी, विदूषक, देवयानी तिला भेटून येतात. माता शर्मिष्ठा व दूधमाय बिंदुमती या माधवीने प्रस्थानाला सुरूवात करून गंगेचा घाट संपल्यावर तेथील वळणावर त्या दोघी तिला भेटायला येतात. माधवीला बिंदुमतीच्या कुशीत जाऊन मोठ्यांदा रडावे वाटत होते. मात्र त्यांचा निरोप घेऊन ती पुढे निघते. प्रस्थानाला सुरूवात केल्यानंतर माधवीच्या पुढे अनेक प्रश्न उभे रहायला हवे होते. मात्र याची कसलीच जाणीव माधवीला नव्हती.

ययाती महाराजांनी एखाद्या सम्राटाशी माधवीचा विवाह करून आठशे अश्व मिळविण्यास गालवाला सांगितले होते. कारण आपल्या कन्येसाठी एखादा आर्यावर्ती नरेश आठशेच काय पण अठरा सहस्त्र अश्वमेधी अश्व देईल अशी खात्री ययाती महाराजांना होती. माधवीला विवाहासाठी अयोध्यानरेश हर्यश्व महाराज हा उचित सम्राट ठरेल या उद्देशाने गालव आपली याचना घेऊन हर्यश्व महाराजांकडे जातो. मात्र त्याची निराशा होते. कारण हर्यश्व महाराजांकडे गालवाला देण्यासाठी केवळ दोनशेच अश्व असतात.

राजज्योतिषांनी महाराजांच्या कुंडलीत पुत्रयोग असून तो चक्रवर्ती सम्राट बनेल असे वर्तविले होते. महाराजांच्या चेहऱ्यावर चिंता पसरली होती. इच्छा पूर्ण होण्यासाठी महाराज राजज्योतिषांना मार्ग विचारतात. तेव्हा गालव त्यांना एक मार्ग सुचवितो. तो म्हणजे ययाती महाराजांची कन्या माधवी माझी मानसकन्या आहे. तिच्यापोटी जो पुत्र होईल तो चक्रवर्ती सम्राट बनेल. आपण पत्नी म्हणून माधवीचा स्वीकार करावा. मात्र त्यांच्याकडे दोनशेच अश्व असतात. माधवीला कौमार्यप्राप्तीचे वरदान आहे तर तिला पुत्र होईपर्यंत आमच्याकडे ठेवा व त्याबदल्यात दोनशे अश्व घेऊन जा असे हर्यश्व महाराज गालवाला सांगतात. कारण कोणत्याही सम्राटाकडे एकाच वेळी आठशे अश्वमेधी अश्व मिळणार नाहीत असे ते सांगतात आणि शेवटी गालव आणि माधवी हा प्रस्ताव मान्य करतात.

धर्मारण्यात माधवीच्या निवासाची व्यवस्था केली जाते. पुत्रप्राप्तीनंतर माधवीला माझ्या स्वाधीन करा असे गालव महाराजांना सांगून माधवीला धर्मारण्यात सोडून तो पुढील अश्वांच्या शोधात निघतो. महाराज हर्यश्व माधवीच्या भेटीसाठी येतात. त्यांना बसायला सांगून माधवी आत जाते. पांढरेशुभ्र वस्त्र परिधान करून ती बाहेर येते. माधवी शिवलिंगाच्या पूजेला बसते तेव्हा हर्यश्व महाराज मदिरेच्या अर्धेअधिक अधीन झालेले होते. बराच वेळ ती ध्यानमग्न बसते. पायात (चाळ) पैंजण बांधून ती नृत्याला आरंभ करते. तिचे नृत्य पाहता-पाहता महाराजांना झोप लागते. माधवीही खूप थकते. मात्र ब्रह्मर्षींची ती वाट बघत असते. तेवढ्यात ब्रह्मर्षी येतात. त्यांनीच कौमार्यप्राप्तीचा वर तिला दिलेला असतो. माधवीने लिंगपूजा केली होती. तेथे जाऊन ब्रह्मर्षी उत्तरपूजा करतात. लिंगविसर्जन करून त्यावरील निर्माल्य दूर करतात. स्त्रीच्या गर्भाशयासारखे ते विवर होते. ब्रह्मर्षींनी दिलेला रस प्राशन करून ती मंचावर जाऊन झोपते व तिला गाढ झोप लागते. तिच्या नाभीतून काहीतरी काढून घेतले जात आहे याची जाणीव तिला होऊन ती त्याचा प्रतिकार करते. मात्र तिचा तो प्रयत्न व्यर्थ ठरतो. 'वसुमन' हे पुत्राचे नामकरण करून ब्रह्मर्षी आपले काम संपवून निघून जातात.

सकाळ होते आणि महाराजांना जाग येते. मात्र बाजूला माधवी नसते. आपल्या अंगावर वस्त्र नाही याची जाणीव त्यांना होते. पितांबर व उत्तरीय परिधान करून ते बाहेर येतात. माधवी स्नान आटपून शंभू महादेवासमोर बसलेली असते. रात्री काय घडले ते महाराजांना आठवत नव्हते. स्नान करून ते निघून जातात. ब्रह्मर्षींच्या प्रयोगानुसार गर्भागारात माधवीचा पुत्र वाढू लागतो. तो जन्माला आल्यानंतर माधवी त्याला हर्यश्व व दृषद्वतीच्या स्वाधीन करून गालवाबरोबर पुढच्या प्रवासास निघते.

विश्वामित्रांना गालवाची आठवण होते व त्याची चौकशी करण्यासाठी गरूडाला गालवाकडे पाठवितात. गरूड धर्मारण्यातल्या माधवीच्या निवासस्थानी येऊन पोहोचतो. मात्र तो वाडा ओस पडलेला असतो. गरूडाला दूरवर मंदिराचा कळस दिसतो. तेथे तो जातो त्याला हर्यश्व महाराजांचा अश्वाधिपती आदिरथ व त्याची पत्नी मोहिनी भेटते. त्यांना माधवी व गालवाची माहिती विचारतो. मात्र त्या दोघांनाही त्यांची माहिती नसते. वसिष्ठ विश्वामित्र संघर्ष संपतो. विश्वामित्रांच्या जीवनात गालवाच्या गुरूदक्षिणेच्या हट्टामुळे माधवीची होणारी तडफड, तिच्या व्यथा-वेदना याला विश्वामित्र कारणीभूत आहेत असे त्यांची पत्नी शीलवती त्यांना म्हणते. त्यातच विश्वामित्रांच्या जीवनात रंभा नावाची अप्सरा येते. तिला विश्वामित्रांचा फार मोह झालेला होता. ती सतत विश्वामित्रांच्या आश्रमात येऊन राहण्याचा हट्ट करत असते. मात्र विश्वामित्रांना तिचा मोह नव्हता. याच रंभेने त्यांना वसिष्ठांची ग्रंथसंपदा विद्याभ्यासासाठी मिळवून दिली होती. विश्वामित्रांच्या मोहामुळे रंभेची अवस्था दयनीय झाली होती. शेवटी कंटाळून रंभा विश्वामित्रांच्या जीवनातून निघून जाते. माधवीच्या तडफडीला विश्वामित्रांना दोषी ठरवून शीलवती मातादेखील विश्वामित्रांच्या जीवनातून निघून जाते.

माधवी व गालव शांतपणे पुढचा प्रवास करत होते. मागच्या प्रवासात गुरूदेवांच्या आठवणी, आश्रमातल्या गप्पा सांगण्यात जात होता. मात्र धर्मारण्यातून बाहेर पडल्यानंतर

त्यांच्यात एक दरी निर्माण झाली होती. अयोध्येनंतर काशी नरेश दिवोदास महाराजांकडे जाण्याचे गालवाने ठरविले होते. दिवोदास महाराजांनी पुत्रप्राप्तीसाठी पुत्रकामेष्टी यज्ञ करण्याचा निर्णय घेतला होता. गालव माधवीचा प्रस्ताव दिवोदास महाराजांकडे ठेवतो. दिवोदास महाराज हा प्रस्ताव मान्य करतात व त्यानंतर भोजनरेश उशीनर महाराजांकडे गालव व माधवी जातात व उशीनर महाराजही गालवाचा प्रस्ताव मान्य करतात. दोनशे अश्वांच्या बदल्यात दिवोदास महाराजांना प्रत्यर्दन व उशीनर महाराजांना शिबी नावाचा पुत्र देऊन माधवी व गालव विश्वामित्रांच्या आश्रमाकडे जाण्यास निघतात. तीन पुत्रांची आई होऊन देखील माधवीला त्यांच्यापासून दूर जावे लागले होते.

हर्यश्व, दिवोदास, उशीनर कुणीही तिच्या शरीराला स्पर्श केला नव्हता. तरी तिला शरीराचा लचका तोडल्यासारखे झाले होते. पुत्रप्राप्तीनंतरचे कौमार्य हे तिला असाध्य झाले होते. मात्र हे सर्व दु:ख समेटून ती पुढच्या प्रवासास निघते. गुरूपौर्णिमा जवळ आली होती. गुरूपौर्णिमेपर्यंत सर्व राजेही अश्व आश्रमात पोहोचवणार होते. पण सहाशेच अश्व मिळाले होते. म्हणजे उरलेल्या दोनशे अश्वांच्या बदल्यात माधवीला गुरूदेवांना अर्पण करायचे असा गालवाचा विचार होता. गुरूपौर्णिमेच्या आदल्या दिवशी माधवीला घेऊन गालव आश्रमात पोहोचतो.

आश्रमात गुरूपौर्णिमेची तयारी सुरू होती. याची सर्व जबाबदारी गुरूदेवांनी शिष्य सहदेवावर सोपविली होती. शीलवती माताही अजून आश्रमात परतली नव्हती. रंभा गेली त्यालाही काळ लोटला होता. आश्रमात नवीन शिष्यांची भरती होत होती. जुने शिष्य आपली जागा सोडायला तयार नव्हते. अयोध्येहून अश्वारोहकांची एक तुकडी आश्रमाकडे आली होती ते सारे अश्व अश्वशाळेत बांधायला गुरूदेव सांगतात. गार्गच्या मदतीने सहदेव ते काम करतो. गालव आश्रमात पोहोचतो त्यावेळी गार्ग व सहदेव त्याच्या स्वागतासाठी प्रमुख दाराशी येतात. दोघांचेही स्वागत करतात. माधवीला तिच्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

निवासस्थानी सहदेव घेऊन जातो. गार्ग आणि गालव अश्वत्थाजवळ येऊन बसतात. गालवाला पूर्वीच्या अनेक आठवणी येऊ लागतात. त्यानंतर गुरूदेव तेथे येतात व गालवाला मिठीत घेतात. गालव लहान मुलांसारखे हुंदके देत रडतो. गालव शांत झाल्यावर गुरूदेव गालवावर खूश आहेत असे गालवाला सांगतात.

दुसऱ्या दिवशी सहाशे अश्वांचे व माधवीचे दान करून गालव गुरूदक्षिणा पूर्ण करतो. विश्वामित्र दोनशे अश्व माफ करून माधवीला प्रतिष्ठानमध्ये सोडून येण्यास सांगतात. मात्र माधवीला ते मान्य नसते. तिला सौदा पूर्ण करायचा असतो. तिला विश्वामित्रांपासून पुत्र हवा असतो मात्र तो नेहमीप्रमाणे गर्भागारात न वाढता आपल्या रक्तामांसाचा तिच्या पोटात वाढणारा पुत्र हवा होता व तशी मागणी ती विश्वामित्रांकडे करते. विश्वामित्र तिची मागणी पूर्ण करतात. पुत्र होईपर्यंत तिला आश्रमाच्या बाहेर एका पर्णकुटीत ठेवतात. ज्यादिवशी तिला पुत्र होतो त्यादिवशी सहदेव त्या पुत्राला घेऊन गुरूदेवांकडे येतो. त्याचे नाव अष्टक ठेवण्यात येते. त्यानंतर ते माधवीला प्रतिष्ठानात सोडून येण्यास सांगतात.

अशाप्रकारे 'अश्वदा' या कादंबरीचा आशय आहे. माधवीची सर्वांविषयीची प्रतिक्रिया कणखर असलेली दिसून येते. तिची उत्तरे तिच्यावर अन्याय करणाऱ्या प्रत्येकाला मान खाली घालायला लावणारी आहेत. तिचे प्रश्न त्यांना निरूत्तर करणारे आहेत. आपण निर्णय घेणारे नसतो. हाकललेल्या गेलेल्या रस्त्यावरून चालत राहणे हेच आपले प्राक्तन आहे हे माधवी ओळखते, त्याचबरोबर सतत ज्ञानाची ओढ असलेला शास्त्रज्ञ आपल्याला विश्वामित्रांच्या रूपात या कादंबरीत दिसतो. त्यासाठी त्याची सतत धडपड चाललेली दिसते व त्यातून आपणही काहीतरी करावे ही प्रेरणा मिळते. माधवीला भोगाव्या लागणाऱ्या यातना पाहून एक अभ्यासक या नात्याने अस्वस्थ झाले. अंतर्मुख होऊन विचार करू लागले. यात माधवीचा काय दोष ? माधवीच्या व विश्वामित्रांच्या व्यक्तिमत्त्वाने मी प्रभावित झाले. त्या व्यक्तिमत्त्वांचे अभ्यासपूर्ण विश्लेषण व समालोचन करावे असे माझ्या मनात आले. म्हणून एक अभ्यासक म्हणून या कादंबरीची निवड प्रबंधासाठी केली आहे.

## शीर्षकाची यथार्थता

'अश्वदा' हे शीर्षक कादंबरीला योग्य असे आहे. कारण या कादंबरीत ययातीने माधवीचे गालवाला दान केलेले असते. कारण ययातीकडे गालवाला दान देण्यासाठी अश्वमेधासाठी लागणारे अश्व नसल्याने गालवाला रिक्त हस्ताने कसे पाठवायचे म्हणून अश्वांच्या बदल्यात माधवीचे दान केले जाते. गुरूदक्षिणा पूर्ण करण्यासाठी गालवाला अश्वमेधासाठी लागणाऱ्या आठशे अश्वांची गरज असते. म्हणून २०० अश्वांच्या बदल्यात एका राजाकडे पुत्र होईपर्यंत गालव माधवीला ठेवतो आणि असे तीन राजांना पुत्र देऊन त्यांच्याकडून सहाशे अश्व मिळविले जातात. म्हणजेच अश्व मिळवून देणारी 'अश्वदा' असा त्याचा अर्थ होतो. म्हणून हे शीर्षक कादंबरीला योग्य असे आहे.

## वातावरणनिर्मिती

'अश्वदा' या कादंबरीतील वातावरण हे पौराणिक आहे. लेखिकेने पौराणिक वातावरण खूप छान साधले आहे. त्यामुळे प्रत्येक प्रसंग आपल्यासमोर घडत आहे असे वाटते. त्यामुळे त्या कालाचे दर्शन आपणाला होते. वातावरणनिर्मिती योग्य असल्याने कथानक उठावदार झाले आहे. 'अश्वदा' मधील वातावरण निर्मितीमुळे त्याकाळचे समाजजीवन कसे होते ते आपल्या लक्षात येते. त्याकाळी जी-जी मूल्ये समाजात होती ती त्यांनी कशी जोपासली होती व त्या मूल्यांमुळे त्यांच्यात कसा संघर्ष होत असे हे लक्षात येते. वातावरणामुळे त्याकाळचे मानवी संबंध कसे होते हे आपल्या लक्षात येते.

## भाषाशैली

'अश्वदा' या कादंबरीची भाषा अत्यंत साधी, सरळ, सोपी आहे. कादंबरीमध्ये माधुर्य व प्रासादगुण आहे. या कादंबरीमध्ये संस्कृत वाक्यांचा, मंत्राचा वापर केला आहे. अनेक संस्कृत शब्दांचा वापर केला आहे. उत्तरीय, गोरस, अध्वर्यूपद, भ्राताश्री, कंचुकी, इंगुदी यासारख्या पौराणिक काळातील शब्दांचा वापर केला आहे. कादंबरीची भाषा कथानकाला अनुरूप अशी आहे. त्यामुळे ही भाषा प्रभावी ठरली आहे.

## निवेदनपद्धती

'अश्वदा' या कादंबरीत लेखिका पात्रांविषयी निवेदन करते. त्यामुळे आपण पात्रांशी एकरूप झालो आहोत असे वाटते. या कादंबरीत संवादामुळे त्या-त्या व्यक्तींच्या मनात चाललेला संघर्ष आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो. त्याकाळातील समाजाचे व व्यक्तींचे आपणाला सखोल आकलन होते. प्रत्येक पात्रांचा परिचय वेगवेगळ्या प्रकरणांच्या माध्यमातून आपल्याला होतो. त्यामुळे प्रत्येक पात्र कसे आहे हे आपणाला समजते. प्रत्येकाच्या भावना आपल्या लक्षात येतात. घटना क्रमाने मांडलेल्या आहेत व त्या घटना घडत असताना त्या पात्रांना आपल्या पूर्वीच्या आठवणी येत असतात. त्यामुळे पार्श्वभूमी आपल्याला समजते.

## व्यक्तिरेखा व संवाद

### माधवी :-

प्रतिष्ठानचा राजा ययाती महाराज यांची कन्या माधवी ही 'अश्वदा' कादंबरीची नायिका आहे. माधवी दिसायला अतिशय सुंदर होती. माधवी विवाह योग्य झाली होती. त्यामुळे तिचे रूप अधिकच उठून दिसू लागले होते. स्वर्गस्थ देवांनाही आतुर करण्याची ताकद तिच्या रूपात होती. हिरण्यगर्भाला अर्घ्य देण्यासाठी माधवी ज्यावेळी राजप्रासादाच्या पायऱ्या उतरत होती त्यावेळी बिंदुमतीला ती एखाद्या "अश्वमेधी अश्वासारखी भासली. डौलदार, शुभ्रवर्णी, श्यामकुंतली, तेच श्यामल केस कुरळपणे विहरत गेल्याने कर्णही श्यामल झालेले, कपाळावर मधोमध कुंकनतिलक, अंगावर एकही अलंकार नाही."[३] माधवीचा स्वभाव हा हट्टी होता. तिचा प्रत्येक हट्ट ययाती महाराज पूर्ण करत असत. पुत्रप्राप्तीनंतर कौमार्य तसेच राहील असे वरदान तिला ब्रह्मर्षींकडून मिळाले होते.

माधवी विवाहयोग्य झाली आहे हे बिंदुमती महाराजांना सांगते. माधवीचे स्वयंवर करून तिचा विवाह एखाद्या सम्राटाशी करून देऊ असे महाराज बिंदुमतीला म्हणतात.

असंख्य चक्रवर्ती सम्राट माधवीच्या स्वयंवराला येतील. माधवी सारख्या स्वयंसिद्धेला त्यातला जो आवडेल त्याच्याशी तिने विवाह करावा असे महाराज ठरवितात. माधवीच्या विवाहाच्या कल्पनेने महाराज आनंदित होतात. एकदा माधवी महाराजांवर रागावून वनविहाराला गेली होती. ती परत आल्यानंतर तिच्या आयुष्याला एक वेगळीच कलाटणी मिळते. तिच्या आयुष्याची घडी विस्कटली गेली होती. तिच्या आयुष्याचा सर्व निर्णय तिला न विचारता महाराजांनी घेऊन टाकला होता. तो निर्णय म्हणजे ययाती महाराजांकडे विश्वामित्रांचा शिष्य गालव आठशे अश्वमेधी अश्वांची मागणी घेऊन आला होता. मात्र ययाती महाराजांकडे आठशे अश्वमेधी अश्व नसतात. पण याचकाला रिक्त हस्ताने न पाठवता आपली कन्या माधवी हिला गालवाला दानात अर्पण करतात. माधवीला जे पुत्र होणार होते ते चक्रवर्ती सम्राट होणार होते. कोणत्याही राजाला चक्रवर्ती पुत्राचा हव्यास असतोच. त्यामुळे एखाद्या समर्थ राजास माधवीला देऊन त्या राजाकडून आठशे अश्व मिळवावेत असे गालवाला सांगतात.

माधवीला महाराजांचा हा निर्णय कळतो. त्यावेळी तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागतात. तिचा भाऊ पुरू तिला समजावतो व या विषयावर मी तातांशी बोलतो असे म्हणतो. मात्र माधवी या गोष्टीला नकार देते. आपल्या पिताश्रींचा हा निर्णय ती मान्य करते. माधवी पुरूला म्हणते, ''एकदा तातांनी तुमचे तारूण्य मागितले होते. आज मी तुमचे बळ मागते आहे. जीवनातल्या सगळ्या दु:खांना सामोरे जाण्याचे बळ मला द्या. म्हणा ...... म्हणा ना तथास्तु .... !''[४] यावरून माधवी आपल्या पिताश्रींच्या निर्णयाला विरोध न करता संमती देते हे लक्षात येते. एक आज्ञाधारक राजकन्या आपल्याला माधवीच्या रूपात पहायला मिळते.

दान समारंभाच्या आदल्या दिवशी माधवी बिंदुमतीला म्हणते, ''उद्या दानानंतर गालव माझा स्वामी होईल. मग मी त्याची दासी म्हणजे भोगदासी होईन ? की पत्नी ?

की....''[५] माधवीचे हे उद्‌गार जिव्हारी लागणारे असे आहेत. यावरून माधवीच्या मनाची व्यथा, तिला होणाऱ्या वेदना यांची जाणीव मनाला होते. दान समारंभ झाल्यानंतर गालव माधवीला घेऊन प्रतिष्ठानातून बाहेर पडतो. गालव जो राजा आठशे अश्वमेघी अश्व देऊन माधवीशी विवाह करेल अशा सम्राटाच्या शोधात होता. मात्र एकाही राजाकडे आठशे अश्वमेधी अश्व नसतात. प्रथम आयोध्यानरेश हर्यश्व महाराजांकडे जातो. त्यांच्याकडे फक्त दोनशेच अश्व असतात. हर्यश्व महाराजांना पुत्र नसतो. माधवीला पुत्रप्राप्तीनंतर कौमार्य तसेच राहील असे वरदान लाभलेले असते. माधवीला होणारे पुत्र चक्रवर्ती सम्राट होणार असतात. त्यामुळे दोनशे अश्वांच्या बदल्यात एक पुत्र होईपर्यंत माधवीला आमच्याकडे ठेवा असा प्रस्ताव दिवोदास महाराज गालवापुढे ठेवतात. गालव व माधवीही हा प्रस्ताव मान्य करतात. माधवी पुत्र होईपर्यंत दिवोदास महाराजांनी तयार केलेल्या राजवाड्यात राहते. ब्रह्मर्षींनी माधवीला वरदान दिलेले असल्यामुळे आपला प्रयोग यशस्वी करण्यासाठी ते माधवीकडे येतात. तिला होणारा पुत्र गर्भागारात वाढवतात. बह्मर्षींचा प्रयोग यशस्वी होतो. मात्र पुत्र होऊनही माधवीला आई झाल्याचे पूर्णत्व मिळत नाही. तिचे कौमार्य अबाधित राहते. तिला या गोष्टीचे फार दु:ख होते. ती मोठ्यांदा आक्रोश करत होती. दोन दिवस एकांतात तिने खूप आक्रोश केला होता. तिसऱ्या दिवशी तिने हर्यश्व महाराजांना निरोप पाठवून पुत्र त्यांच्या व दषद्वतीच्या स्वाधीन करून गालवाबरोबर पुढच्या प्रवासास ती निघून गेली होती. त्यानंतर ते काशीला जाण्यास निघतात. वाटेत एका ब्राह्मण कुटुंबाच्या इथे ते मुक्काम करतात. त्या ब्राह्मणीच्या बाळाला पाहून तिला वसुमनाची आठवण येते. त्यावेळी तिला वाटते गालवाला उठवावे त्याला सांगावे, मी काशीला येणार नाही. मला कृत्रिम गर्भाशय नको. माझा गर्भ माझ्या उदरात वाढला पाहिजे. माझ्या शरीराची रचना त्या गर्भाने बदलली पाहिजे. माझ्या सगळ्या अवयवांना मी आई झाल्याची जाणीव हवी आहे. तिची अवस्था युद्धातल्या जखमी अश्वासारखी झाली होती.

त्यानंतर काशी नरेश दिवोदास महाराजांकडे जाऊन दोनशे अश्वांच्या बदल्यात तिने एका पुत्राला जन्म दिला होता. काशीनंतर भोज नरेश उशीनर महाराजांकडेही दोनशे अश्वांच्या बदल्यात एका पुत्राला जन्म देऊन तो त्यांच्या स्वाधीन केला होता. गुरूपौर्णिमेचा दिवस जवळ येत होता. ते दोघे विश्वामित्रांच्या आश्रमाकडे जाण्यासाठी निघतात व गुरूपौर्णिमेच्या आदल्या दिवशी ते आश्रमात पोहोचतात. गुरूपौर्णिमेदिवशी गालव सहाशे अश्व व उरलेल्या दोनशे अश्वांच्या बदल्यात माधवीला गुरूदेवांना अर्पण करतो. विश्वामित्र दोनशे अश्व माफ करून माधवीला प्रतिष्ठानात सोडण्यास सांगतात. मात्र माधवीला हे मान्य नसते. तिला सौदा पूर्ण करायचा होता. मात्र यावेळी तिला गर्भागारात वाढणारा पुत्र नको होता. गुरूदेव विश्वामित्रांपासून माधवीला तिच्या पोटात वाढलेला पुत्र हवा होता व आई झाल्याचे पूर्ण समाधान तिला मिळवायचे होते. विश्वामित्र तिची इच्छा पूर्ण करतात. मात्र पुत्र स्वत:कडे ठेवून माधवीला प्रतिष्ठानात सोडून येण्यास सांगतात. त्यामुळे चार पुत्र होऊन देखील माधवीला आई झाल्याचे समाधान मिळत नाही. त्यांच्यापासून तिला कायमचे दूर जावे लागते.

माधवीविषयी डॉ. मंगला आठलेकर म्हणतात, ''ययाती महाराजांच्या कन्येचा माधवीचा काळ मागे लोटल्याला तीन-चार हजार वर्षे सहज होऊन गेली असतील हे दु:ख फार सनातनी आहे. आज माधवीचे दु:ख समजून घेताना प्रत्येक स्त्रीला असे तर वाटत नसेल की आपल्याही आयुष्यात कधी ना कधी जाणवणारी रिक्तता, पोकळी हे माधवीच्या या सनातन दु:खाचेच रूप आहे आणि या अर्थाने माधवी हा आपल्याच शरीर मनाचा एक अविभाज्य भाग आहे ! शक्यता आहे. माधवी ही फक्त पुरणातील एक व्यक्तिरेखा नाही. माधवी ही स्त्री असण्याचा अर्थ आहे. कधी ना कधी दिसणारे आरशातले स्वत:चे प्रतिबिंब आहे.''[६]

माधवीची व्यक्तिरेखा वाचकांना अंतर्मुख करून सोडते. कादंबरीत माधवीच्या

व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू वाचकांच्या नजरेसमोर येतात. पुराण काळातील एक आज्ञाधारक राजकन्या वाचकांच्या समोर येते.

**गालव :-**

महाभारतामध्ये गालव आख्यान येते. विश्वामित्रांचा सर्वात आवडता शिष्य गालव होता. विश्वामित्रांचे त्याच्यावर पुत्राप्रमाणे प्रेम होते. शीलवती माताही गालवावर पुत्राप्रमाणे प्रेम करत होती. गालवाची गुरूदेव विश्वामित्रांवर फार भक्ती होती. गालव गुरूदेवांची व माता शीलवतीची खूप सेवा करत होता. गुरूदेव नसताना आश्रम व्यवस्थित सांभाळत होता. एकदा धर्मऋषी आश्रमात येऊन न जेवता गेले होते. तेव्हा ते परत आश्रमात येऊन जेवत नाहीत तोपर्यंत विश्वामित्र अन्न वर्ज्य करतात. केवळ गोरस प्राशन करून राहीले. गालवानेही त्यांच्याबरोबर उपवास धरला होता व धर्मऋषी आल्यानंतर दोघांनी उपवास सोडला. एवढी त्याची गुरूदेवांवर श्रद्धा होती. गुरूदेवांचे पुत्रही त्याला बांधवाप्रमाणे मानत होते. गार्गचे व गालवाचे चांगले पटत होते. गालवाचे शिक्षण पूर्ण झाले होते. त्यामुळे गुरूपौर्णिमेचा कार्यक्रम झाला की तो आश्रम सोडून जाणार होता. त्याने गुरूपौर्णिमेची जोरदार तयारी केली होती. गुरूदेवांना बसण्यासाठी रात्रभर जागून खूप छान आसन तयार केले होते. गुरूपौर्णिमेदिवशी अनेक नवीन विद्यार्थी व त्यांचे पालक आले होते. पहिले विद्यार्थी आश्रम सोडून चालले होते. आश्रमातले वातावरण त्या दिवशी खूप छान होते. गुरूदेव गुरूदक्षिणा स्वीकारत होते. मात्र गालवाकडून त्यांनी गुरूदक्षिणा स्वीकारली नाही. त्यामुळे त्याला खूप वाईट वाटले. गुरूदेवांनी गुरूदक्षिणा मागावी असे तो त्यांना सारखे म्हणत होता. मात्र गुरूदेव सतत त्याला विरोध करत होते. तुझ्या कामातूनच मला गुरूदक्षिणा मिळाली असे त्याला म्हणतात अाणि तरीही गुरूदक्षिणेचा हट्ट गालवाने सोडला नव्हता. मग रागाच्या भरात गुरूदेव आठशे अश्वमेधी अश्व घेऊन येण्यास गालवाला सांगातात. तीच माझी गुरूदक्षिणा आहे असे ते म्हणतात.

गालव आश्रम सोडून बाहेर पडतो. गुरूदेवांनी मागितलेली गुरूदक्षिणा मिळविणे ही सोपी गोष्ट नव्हती. तो खूप विचार करू लागतो. मात्र त्याला कुठलाही मार्ग दिसेनासा झाला होता. शेवटी तो आत्महत्या करण्याकडे वळतो. तेवढ्यात गरूड तेथे येतो व अश्व मिळविण्यासाठी सर्व दिशांची माहिती देतो. त्यासाठी गालवाला प्रतिष्ठानच्या ययाती महाराजांकडे आणून सोडतो. मात्र ययाती महाराजांकडे आठशे अश्वमेधी अश्व नसतात. ययाती महाराज आपली कन्या माधवी हिला दानात अर्पण करतात. माधवीला घेऊन गालव प्रतिष्ठानातून बाहेर पडतो. मात्र आपण कुठे जावे त्याला कळत नव्हते. एक आठवडा ते सतत प्रवास करत होते. मात्र माधवी त्याला त्याबद्दल काहीही विचारत नव्हती. ती फक्त त्याच्या पाठोपाठ चालत होती. प्रथम अयोध्यानरेश हर्यश्व महाराजांकडे जाण्याचे गालव ठरवितो. हर्यश्व महाराजांकडे जाऊन माधवीच्या बदल्यात आठशे अश्वांची मागणी करतो. मात्र त्यांच्याकडे आठशे अश्व नसतात. फक्त दोनशेच अश्व होते. दोनशे अश्वांच्या बदल्यात माधवीपासून एक पुत्र अशी बोलणी त्या दोघांच्यात होते व माधवीही तो निर्णय मान्य करते. कारण तिलाही पुत्रप्राप्तीनंतर कौमार्यप्राप्ती ह्या वरदानाचा अर्थ जाणून घ्यायचा असतो. तिला हर्यश्व महाराजांकडून एक पुत्र होतो व तो त्यांना देऊन गालव व माधवी पुढच्या प्रवासाला निघतात. अयोध्येला जाण्यापूर्वी माधवी व गालव भरपूर गप्पा मारत असत. गालव तिला आश्रमातल्या गुरूदेवांच्या गोष्टी सांगत असे त्यामुळे वेळ निघून जात होता. मात्र अयोध्येनंतरच्या प्रवासात माधवी एकदम शांत झाली होती. तिला आपल्या पुत्राची आठवण येत असावी असे गालवाला वाटले होते. ययातीकडून माधवीचे दान स्वीकारून माधवीच्या दानातून अश्वप्राप्ती करून गुरूदक्षिणेची पूर्तता करण्याचे गालवाने ठरविले होते. या गोष्टी गालवाच्या अंतर्मनाला कुठेतरी बोचत असतात. माधवीबद्दल त्याच्या मनात प्रेम, जिव्हाळा, वात्सल्य होते. त्याचबरोबर तिच्या या परवडीला आपणच कारण आहोत हे जाणून गालव पश्चात्ताप दग्ध होतो. तिच्या या साऱ्या तडफडीला,

अवस्थेला आपण जबाबदार आहोत असे त्याला वाटत होते. प्रतिष्ठान सोडल्यानंतर त्याला वाटले होते एखाद्या राजाशी माधवीचा विवाह करून द्यायचा असे त्याने ठरविले होते. मात्र एकाही राजाकडे आठशे अश्वमेधी अश्व नव्हते. त्यामुळे तीन वेळा माधवीला दोनशे अश्वांच्या बदल्यात एक पुत्र असा विनिमय करावा लागला होता. दुसऱ्यांदा दिवोदास, तिसऱ्यांदा उशीनर महाराजांकडे पुत्रजन्मापर्यंत माधवीला ठेवण्यात आले होते. उरलेल्या दोनशे अश्वांच्या बदल्यात गुरूदेवांकडे माधवीला अर्पण करायचे असे त्याने ठरविले होते. गुरूदेवांच्या भेटीची ओढ गालवाला लागली होती. माधवीला घेऊन गालव आश्रमात पोहचतो. गुरूदेवांना मिठी मारून तो हुंदके देऊन रडत होता. गालवाला गुरूदेवांना जे सांगायचे होते ते अश्रूंच्या माध्यमातून गुरूदेवांना सांगत होता. गुरूपौर्णिमेदिवशी एक-एक अश्व मंत्र म्हणत त्याने गुरूदेवांना अर्पण केले होते. सहाशे अश्वांचे दान होईपर्यंत संध्याकाळ झाली होती. एकाहत्तर पावले चालत जाऊन सूर्यदर्शन केल्याशिवाय दानविधी संपत नाही. त्यामुळे गालवाने गुरूदेवांना विनंती केली की, अश्वत्थापर्यंत चलावे गुरूदेव.[७] गुरूदेवांना गालवाची चेष्टा करावीशी वाटली. उच्चासनावरून खाली उतरताना ते गालवाला म्हणाले, ''म्हणजे सहाशे अश्वांत माझी बोळवण करणार तर तू ? मी तुला आठशे अश्व मागितले होते गालवा.''[८]

विश्वामित्रांच्या या बोलण्यावर माधवी म्हणते, ''सहाशे अश्वच नव्हे तर ही माधवीही मुनिवर गालवांनी आपल्याला दानात दिली आहे. दोनशे अश्वांचे बळ आहे तिचे. तुम्ही विसरलात. मी विसरले नाही अजून. सहाशे अश्व आणि ही माधवी असे म्हणाले होते मुनिवर.''[९] तिच्या या बोलण्याने सारे सुन्न सुन्न झाले. गालव आणि विश्वामित्र न बोलता चालत अश्वत्थाजवळ गेले व त्यांनी दोघांनी सूर्यदर्शन केले. दान समारंभानंतर दान देणाऱ्या व्यक्तीने आपल्या घरी जायचे असते. त्यामुळे गालवाची राहण्याची व्यवस्था आश्रमात न करता आश्रमाबाहेरील विद्यार्थी वसतिगृहात करण्यात आली होती. दुसऱ्या

दिवशी गालव आश्रमात आला तेव्हा वातावरण तंग होते. गालव आश्रमात आला तेव्हा गार्ग रागारागाने तेथून निघून गेला होता. तेव्हा माधवी गोरसाचे पात्र घेऊन तेथे उभी होती. गालवाने माधवीला तू गार्गला शुभ्र वस्त्रे का दिली हे विचारले. तेव्हा माधवी त्यांना म्हणाली की, ''मी फक्त वस्त्रे दिली मुनीवर. तीही एकाच माणसाला. तुमच्यासारखा विनिमय केला नाही मी आणि मला तुम्ही उधळलीत तीनदा. फेकलीत तीन राजांच्या पुढ्यात. तेव्हा मला विचारले होतेत तुम्ही ?''[१०] तुमच्या ऋणातून मुक्त झालात. आता तुम्ही जाऊ शकता. माधवीच्या या बोलण्यावर गालव काहीच बोलत नाही. गुरूदेव स्नान करण्यासाठी गेले होते. गालव त्यांच्याकडे गेला, त्यावेळी गुरूदेव गालवाला म्हणाले की, तू कुठे जायच्या अगोदर माधवीला नहुषांच्या राज्यात पोहचव. मात्र गालव म्हणतो की, दोनशे अश्वांच्या बदल्यात मी तुम्हांला माधवी दिली आहे. तुम्ही मला माफ कराल. मात्र माधवी आता त्याला तयार नाही. तिला आता सौदा पूर्ण करायचा होता. तिला बोलण्याचा अधिकार मला राहिला नाही. मला आता जायची परवानगी द्या. तुम्ही मला केव्हाही बोलवा मी तुमच्या सेवेस हजर राहीन असे म्हणून गालव गुरूदेवांचा निरोप घेऊन निघून जातो.

गालव ही व्यक्तिरेखा वाचकांना भावते. गालव सभ्य सुसंस्कृत होता. माधवीचा होणारा विनिमय, त्यातून होणारी पुत्रप्राप्ती, ते सर्व सोडून जाताना माधवीची होणारी घालमेल त्याला पश्चात्ताप करण्यास भाग पाडते. गालव माधवी बरोबर प्रवास करत असतो. त्यावेळी त्याचे आचरण शुद्ध, सात्विक, प्रेमळ असते. माधवीला या सर्व प्रवासात, दु:खात गालव हा एकच विश्वासू आधार वाटतो. कारण त्याने तिला सांभाळून नेलेले असते. विश्वामित्रांना गुरूदक्षिणा देण्याच्या हट्टापायी त्याला हा कर्मभोग भोगावा लागतो. त्याचे आपल्या गुरूबद्दल असलेले प्रेम, त्याग, सेवा या गोष्टी वाचकांना खूप भावतात.

**विश्वरथ/विश्वामित्र :-**

प्रतिष्ठानप्रमाणेच कान्यकुब्ज हे एक राज्य होते. कान्यकुब्जचा राजा गाधीराज हा होता. या राजाला अश्वांचे फार वेड होते. या गाधीराजाचा मुलगा विश्वरथ. हाच पुढे विद्या संपादन करून विश्वामित्र झाला. विश्वरथाला घोड्यावर बसायला, शिकार करायला, पोहायला खूप आवडत होते. विश्वरथाची बहीण सत्यवती हिला शंख-शिंपल्यांचे खूप वेड होते. विश्वरथ अनेक प्रकारचे शंख सत्यवतीला काढून देत असे. एकदा कान्यकुब्जमध्ये और्याकडून धनुर्विद्या आणि कोसल नरेश त्रिधन्वा यांच्याकडून अश्वविद्या संपादून कोसल देशाहून ऋचिक नावाचा युवक येतो. तो राजवाड्यात येऊन गाधीराजाशी अश्व विद्येवर चर्चा करत असे. विश्वरथही दोन-चारदा चर्चेला गेला होता. मात्र या चर्चेत आपली बहीण सत्यवतीचे काय काम हे त्याला कळत नव्हते. एकदा त्याने सत्यवती, तिच्या मैत्रिणी आणि ऋचिक यांना गंगेवर पाहिले. विश्वरथ तिथे गेल्यानंतर साऱ्या निघून गेल्या. विश्वरथ आणि ऋचिक दोघेच तिथे उरले. ऋचिकाच्या हातातील शंख पाण्यात पडतो तो विश्वरथ काढतो. सत्यवतीला तो शंख देण्यासाठी विश्वरथ तिच्या प्रसादी जातो. सत्यवतीला ऋचिकच आला आहे असे वाटते, त्यामुळे ती त्याचे नाव घेते. त्यामुळे सारे प्रकरण विश्वरथाच्या लक्षात येते. ऋचिकाने गाधीराजांकडे सत्यवतीशी विवाह करण्याचा प्रस्ताव मांडला होता. मौल्यवान वस्तूंची जपणूक करण्यासठी काही ताकद असावी लागते ती तुझ्याकडे आहे हे तुला सिद्ध करावे लागेल अशी अट गाधीराजांनी ऋचिकाला घातली होती. विश्वरथाला ऋचिक फार आवडत होता त्याची या लग्नाला संमती होती. एके दिवशी ऋचिक गावाबाहेर रथ घेऊन गेला होता. काही दिवसांनी तो कान्यकुब्जला एखाद्या राजकुमारासारखा परततो. येताना असंख्य पांढरेशुभ्र श्यामकर्णी अश्व तो घेऊन आला होता. गाधीराजांनी ऋचिकाशी सत्यवतीचा विवाह करून दिला. हा विवाह अख्ख्या आर्यावर्तात गाजला होता. गाधीराजांनी अश्वांच्या मोबदल्यात आपली कन्या दिली होती.

गाधीराजांच्या मृत्यूनंतर कान्यकुब्जची जबाबदारी विश्वरथावर येऊन पडली होती. विश्वरथ कुशिकांचा पुढारी झाला होता. मात्र युद्ध, लढाया, संपत्ती आणि राज्याचा विस्तार एवढेच आपले जीवित कार्य नाही असे विश्वरथाला वाटत होते. हिरण्यगर्भासारखे म्हणजे सूर्यासारखे त्याला तेजोमय प्रकाशमान व्हायचे होते. तो पाण्यात उभा राहून हिरण्यगर्भाला प्रार्थना करत असे. ''मला तुझ्यात सामावून घे. माल तेजोमान कर. प्रकाशमान कर.''[११]

एकदा विश्वरथ शिकारीला गेला होता. खूप रात्र झाल्यामुळे जवळच असलेल्या वसिष्ठांच्या आश्रमात मुक्काम करण्यास विश्वरथ थांबतो. आश्रमात उत्तम शयनव्यवस्था, गरम पाण्याची कारंजी, उत्तम प्रतीचे भोजन होते. ते पाहून विश्वरथ थक्क झाला होता. वसिष्ठांची विद्या जाणून घेण्याचा प्रयत्न विश्वरथाने केला होता. मात्र वसिष्टांनी त्यास नकार दिला. आश्रमातून बाहेर पडल्यानंतर त्याने आपल्या सैनिकांना झाडीत लपून वसिष्ठांच्या शिष्यांवर लक्ष ठेवण्यास सांगितले होते. सर्व बी-बियाणे, सापडील ते पदार्थ विकत घेऊन तो कान्यकुब्जला आला होता. कान्यकुब्जमध्ये उत्तम प्रतीच्या धनधान्याची निर्मिती केली होती. ह्या धान्याची वसिष्ठांच्या आश्रमशाळेत तपासणी केल्यानंतर हे बीज आपलेच आहे हे वसिष्ठांच्या लक्षात येते. वसिष्ठांशी वैर निर्माण झाल्यामुळे विश्वरथ अस्वस्थ झाला होता. राज्यत्याग करून ब्रह्मर्षी होण्याचे विश्वरथ ठरवितो. त्यासाठी कान्यकुब्ज सोडून तपश्चर्येला जातो. मिळविलेले ज्ञान लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तो परत येतो. तपश्चर्येला जाताना शीलवती व गालवाला त्याने अयोध्येत सोडलेले असते. त्यांच्या भेटीच्या ओढीने तो अयोध्येत येतो. पुन्हा तेथे वसिष्ठांशी भेट होते. वसिष्ठांनी अयोध्येचा राजा सत्यव्रताला दोषी ठरवून हद्दपार केले होते. सत्यव्रताच्या वडिलांना तपश्चर्येला पाठविले होते. वसिष्ठ स्वत: अयोध्येचे राज्याधिकारी बनले होते. सत्यव्रताला न्याय मिळवून द्यायचा असे विश्वरथ ठरवितो. त्यासाठी त्याला वसिष्ठांशी वैर घ्यावे लागते. सत्यव्रताला न्याय मिळवून देणयास विश्वरथ यशस्वी होतो. सत्यव्रताला त्याचे

राज्य परत मिळवून देतो. वसिष्ठ व विश्वरथ यांच्यातील वाद पुढे सतत चालूच होता. सत्यव्रताने एक यज्ञ करायचा ठरवला होता. त्यात वसिष्ठ व विश्वरथ या दोघांनाही आमंत्रित केले होते. विश्वरथाच्या हाती यज्ञाचे अध्वर्यूपद दिले होते. मात्र हा यज्ञ वसिष्ठांना मान्य नव्हता. यावरून पुन्हा एकदा विश्वरथ व वसिष्ठ यांच्यामध्ये मतभेद निर्माण होतात. सत्यव्रताच्या दरबारात विश्वरथ आपणाला प्राप्त झालेले ज्ञान प्रकट करतो. त्याचे बोलणे ऐकून सभा आश्चर्यचकित होते. सत्यव्रत त्याच्या बोलण्याने भारावून गेला होता. तो विश्वरथाला म्हणतो, ''ब्रह्मर्षीच नव्हे तर विश्वामित्र आहात आपण. हा विश्वामित्र प्रतिसृष्टी निर्माण करेल यावर विश्वास आहे माझा. तुमच्या या निर्मितीकार्यात मी तुमच्या बरोबर आहे. गुरूदेव याच पृथ्वीचा आपण स्वर्ग करू. नव्या कल्पना, नवे आचारधर्म, नवे तत्त्वज्ञान हे सारे अनुभवण्यास मी उत्सुक आहे. आजपासून आपण माझे स्नेहीच नव्हे तर गुरूही आहात. गुरूदेव विश्वामित्र ... अखिल जगताचा-विश्वाचा मित्र तो विश्वामित्र!''[१२] विश्वरथाचा विश्वामित्र होतो. मात्र वसिष्ट सभेतून रागाने निघून जातात.

विश्वरथाला तपश्चर्येची गरज वाटू लागली होती. एकांत हवासा वाटत होता. तो पुन्हा अरण्यात जातो. तेथेच त्याला सत्यव्रताच्या निधनाची वार्ता समजली होती. हरिश्चंद्राचा राज्याभिषेक करून वसिष्ठांनी पुन्हा अयोध्येचे राजकारण हाती घेतले होते. घरातील व्यक्तींना भेटून खूप दिवस झाल्यामुळे विश्वामित्र कान्यकुब्जला परत येतो. त्याचवेळी राजा हरिश्चंद्र आजारी पडले होते. त्यांना बरे वाटावे म्हणून वसिष्ठांनी एक यज्ञ करायचा ठरविला होता. त्यासाठी विश्वामित्राला बोलविण्यात आले होते. या यज्ञास शुन:शेप नावाच्या ब्राह्मणपुत्राला बळी देण्य साठी विकत आणले होते. विश्वामित्र हा यज्ञ थांबवितो व त्या पुत्राचे प्राण वाचवितो. त्यामुळे वसिष्ठ व विश्वामित्र यांच्यात संघर्ष निर्माण होतो.

विश्वामित्राला सुदासांच्या राज्यात बोलावणे येते. तेथे वसिष्ठ असतात. मात्र येथे वसिष्ठ व विश्वामित्र यांच्यात संघर्ष होत नाही. विश्वामित्रांच्या स्वागताची सर्व तयारी

स्वत: वसिष्ठ करतात. विश्वामित्रांसाठी भव्य असा कक्ष उभारतात. त्याला रंगरंगोटी करतात. असा कक्ष आपल्या राज्यात दुसरा नाही असे सुदास महाराजांचे मत होते. विश्वामित्रांचे सुदासांच्या राज्यात आगमन होते. त्यावेळी वसिष्ठ त्यांच्या स्वागताला उभे होते. वसिष्ठांची पत्नी माता अरूंधती हिने विश्वरथाला देण्यासाठी बकुळीची फुले दिली होती. ती फुले वसिष्ठ विश्वामित्रांच्या हातात देतात. विश्वामित्रही सर्व संघर्ष विसरून वसिष्ठांना वाकून नमस्कार करतो. तसेच वसिष्ठदेखील विश्वरथाला आपल्या हृदयाशी धरतात आणि येथे वसिष्ट व विश्वामित्र यांच्यातील संघर्ष संपून सलोखा, मित्रता निर्माण होते. सुदास महाराज विश्वामित्राला राज्याचे पौरोहित्य स्वीकारण्यास विनवतात. मात्र विश्वामित्राला वसिष्ठांच्या आठवणीने अस्वस्थ केले होते. वसिष्ठ येथे असताना आपण त्यांचे पद स्वीकारायचे हे त्याच्या मनाला पटत नव्हते. दुसऱ्याच दिवशी सर्वांचा निरोप घेऊन तो सुदासांच्या राज्यातून आश्रमात परत आला होता.

विश्वामित्रांनी आपला शिष्य गालव याला 'आठशे अश्वमेधी अश्व' गुरूदक्षिणा मागितली होती. ते अश्व मिळविण्यासाठी गालव प्रतिष्ठानात जातो. विश्वामित्रांना अश्वांचे फार वेड होते. त्याचप्रमाणे प्रतिष्ठानचा मोह होता. अश्व आणण्याच्या निमित्ताने आपल्याला प्रतिष्ठानात जाता येईल व ययातीकन्या माधवीला भेटता येईल असे त्यांना वाटत होते. माधवीला मिळालेल्या वरदानाचा अर्थ त्यांना जाणून घ्यायचा होता. मात्र तसे घडले नाही. अश्व मिळविण्यासाठी माधवीला तीन राजांकडे आपला विनिमय करावा लागला. माधवीची ही अवस्था आपल्यामुळे झाली असे विश्वामित्रांना वाटत होते. तीन राजांकडे माधवीला ठेवून गालव सहाशेच अश्व मिळवतो. उरलेल्या दोनशे अश्वांच्या बदल्यात माधवीला गुरूदेवांना अर्पण करतो. विश्वामित्र दोनशे अश्व माफ करून माधवीला प्रतिष्ठानात सोडण्यास सांगतात. मात्र माधवीला सौदा पूर्ण करायचा असतो. तिला विश्वामित्रांपासून पुत्र हवा असतो. तिच्यावर झालेल्या अन्यायाला विश्वामित्र जबाबदार

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

असतात. त्याचा राग ती विश्वामित्रांवर काढत होती. विश्वामित्र व माधवी यांना अष्टक नामक पुत्र होतो. विश्वामित्र पुत्राला स्वत:कडे ठेवून माधवीला प्रतिष्ठानात सोडण्यास सांगतात.

विश्वामित्रांच्या जीवनात रंभा नावाची अप्सरा आली होती. तिला विश्वामित्रांचा मोह फार झाला होता. ती विश्वामित्रांच्या आश्रमात राहण्याचा हट्ट करत होती. विश्वामित्र त्या सौंदर्यवती अप्सरेच्या मोहात न गुंतता आपले कार्य करत होते. विश्वामित्रांना रंभेचा मोह नव्हता. आश्रमाच्या बाहेर रंभेला पर्णकुटी बांधून दिली होती. आश्रमात येण्यास तिला बंदी होती. शेवटी कंटाळून रंभा विश्वामित्रांच्या जीवनातून निघून जाते. याच विश्वामित्रांनी गायत्रीमंत्रासारखा पवित्र उज्ज्वल मंत्र जगाला दिला. तेजाची उपासना शिकवली. ब्राह्मणांना ब्राह्मणत्व देणारा, तेज देणारा गायत्रीमंत्र या ब्रह्मर्षींचा ! तमाकडून, रजाकडून सत्त्वाकडे कसे जाता येते याचा आदर्शपाठ म्हणजे विश्वामित्र ! चुकलं तरी पुन्हा कसं उठायचं याचं साक्षात उदाहरण म्हणजे विश्वामित्र !

विश्वामित्रांना ज्ञानलालसा होती. नवीन शिकण्याची धडपड, प्रयोगशीलता त्यांच्यात होती. एक ध्येयनिष्ठ व्यक्तिमत्त्व म्हणून लेखिकेने विश्वामित्रांची व्यक्तिरेखा अत्यंत लालित्यपूर्ण शैलीत चितारली आहे.

**ययाती :-**

प्रतिष्ठान हे चंद्रवंशीय राजांचे राज्य भृगू हे त्या राज्याचे पुरोहीत होते. प्रतिष्ठानचा राजा नहुष होता व त्याला यती व ययाती हे दोन पुत्र होते. नहुषाने पुरोहीत वर्गाला हाताशी धरले होते. वृद्ध भृगू पालखी खांद्यावर घेऊन धावत असे, पण वय झाल्याने त्याचे पाय डगमगत असत. त्याच्या पावलांचा वेग कमी होत होता. पालखीत बसलेला नहुष मोठ्याने ओरडू लागत होता. धावत रहा असे सारखा म्हणता होता. भृगू धावत राही व मध्येच त्याचे पाय लटपटत असत व तो पडत होता. एके दिवशी भृगूला नहुषाचा खूप राग येतो आणि

तो नहुषाला पालखीतून खाली ओढतो. फरफटत त्याला रस्त्यावरून ओढत नेतो. रक्तबंबाळ झालेला नहुष राजवाड्यात आला होता तेव्हा यती थोडा जाणता होता. ययाती तर अगदी लहान होता. पण त्या घटनेपासून दोघांनाही भृगूचे खूप भय वाटत होते.

ययाती हा यज्ञ, याग, दान, धर्म, राज-काज या साऱ्यांमध्ये निपुण होता. सर्व आर्यावर्तींचे लक्ष एक उत्तम वर म्हणून ययातीकडे लागून राहिले होते. शुक्राचार्यांची कन्या देवयानी हिच्याशी त्याने विवाह केला होता. देवयानीची दासी शर्मिष्ठा हिच्याशीही त्याने विवाह केला होता. अगोदर त्या दोघींमध्ये राणी व दासी असे नाते होते. मात्र विवाहामुळे त्यांच्यात सवतीचे नाते निर्माण झाले होते. त्यामुळे त्या दोघींच्यात खूप भांडणे होत असत. त्या दोघींच्या भांडणाला ययाती फार कंटाळला होता. बाहेरही त्याची दोन-चार प्रेमप्रकरणे होती. त्याचा ज्येष्ठ बंधू यती राज्यत्याग करून वनात निघून गेला होता. त्यामुळे प्रतिष्ठानचा सम्राट म्हणून ययातीची नेमणूक झाली होती.

ययाती हा महाभारतातला प्रसिद्ध सम्राट होता. ययातीला देवयानीपासून यदु आणि शर्मिष्ठेपासून पुरू हे दोन पुत्र झाले होते. अश्रूबिंदुमती या अप्सरेकडून माधवी ही कन्या प्राप्त झाली होती. मात्र माधवी ही अश्रूबिंदुमतीचीच मुलगी हे मात्र अजूनही न उकललले गूढ आहे. ययाती महाराजांच्या जीवनात अनेक स्त्रिया आल्या होत्या. त्यांचा त्याने स्वैरपणे उपभोग घेतला होता. त्या स्त्रियांच्या सर्व मागण्या तो पूर्ण करत होता. त्याचेच एक दाहक उदाहरण म्हणजे अश्रूबिंदुमतीची मागणी होय. ती महाराजांना म्हणते, ‘‘नहुषनंदनाची पट्टराणी होण्यापेक्षा त्याची प्रियतमा होणे जास्त सुखकारक असेल. पण त्यासाठी तुम्हाला तुमचे हे वृद्धत्व तुमच्या एखाद्या पुत्राला देऊन त्याचे तारूण्य घेऊन यावे लागेल माझ्यासाठी’’ ही मागणी तिने ययाती महाराजांकडे केली होती.

देवयानीचा पुत्र यदु हा महाराजांचा ज्येष्ठ पुत्र होता. देवयानीच्या छत्रछायेत वाढलेला, तिच्याच आचारविचारांचा परिपाक होता. त्याच्याशी काही बोलणे त्यांना

शक्य नव्हते. त्याच्या काय प्रतिक्रिया होतील याने महाराज भयकंपित झाले होते. शर्मिष्ठा व पुरू तरी आपल्याला समजून घेईल असे त्याला वाटत होते. पुरूचा त्यांच्यावर फार जीव होता. पुरूचा चित्रलेखेशी विवाह होऊन काही महिनेच झाले होते. महाराज आपली याचना घेऊन पुरूच्या प्रासादात जातात. पुरूला म्हणतात मी तुझ्याकडे काहीतरी मागण्यासाठी आलो आहे. त्यावर पुरू म्हणतो, ''मी तुम्हांला काय देणार तात ? सारे तुमचेच आहे ! माझे आहे ते फक्त हे शरीर आणि तेही तुमचेच आहे.''[१३] त्याच्या डोळ्यांत पाहत महाराज म्हणतात, ''पुत्रा, तुझे हे शरीरच मला हवे आहे. देशील ? मला हवे आहे तुझे तारूण्य !''[१४] त्याने पित्याला आपले तारूण्य देऊन टाकले होते. मात्र आपल्या पत्नीचा एखाद्या शस्त्रासारखा वापर करून तो तिच्यावर अन्याय करत होता. दिवसेंदिवस त्याचे आयुष्य भयावह झाले होते. त्याला रात्रीच्या अंधाराची भीती वाटू लागली होती. चित्रलेखेचे रूप त्याच्या डोळ्यात रूतू लागले होते. त्यावर स्वामीत्व मिळविण्याची त्याची कामना सफल होत नव्हती. त्याला आपल्या शयनगृहात जावेसे वाटत नव्हते. चित्रलेखेला आपला प्रियतम हरवून गेल्याचे जाणवत होते. तिला त्याची चीड येऊ लागली होती. तिला त्याची किळस येऊ लागली होती. आपल्या म्हाताऱ्या पतीकडे ती तिरस्काराने पाहत होती. तिची ती नजर पुरूला जाळत होती. अशा मन:स्तापातच चित्रलेखेचा मृत्यू होतो. चित्रलेखेचा मृत्यू ही साधी गोष्ट नव्हती. तिच्या मृत्यूनेच पुरूला जख्ख म्हातारा बनवले होते. त्या दिवसातल्या आठवणीने त्याचा चेहरा वृद्ध भयानं, काळाहीन दिसू लागला होता. अश्रू आणि पुरू ययाती महाराजांचे दोन जीवलग, पण पुरूच्या जिव्हारी घाव घालून महाराज अश्रूबिंदुमतीमध्ये रमले होते. पुरूची रक्ताळलेली जखम त्यांना दिसलीही नव्हती. ययाती महाराजांनी स्वार्थासाठी आपल्या पुत्राचा बळी घेतला होता.

ययाती महाराजांकडे विश्वामित्रांचा शिष्य गालव 'आठशे अश्वमेधी अश्वांची' मागणी घेऊन येतो. ययातीकडे आठशे अश्वमेधी अश्व नसतात. याचकाला रिक्त हस्ताने

पाठविले तर प्रतिष्ठानची प्रतिष्ठा धुळीला मिळेल असे ययातीला वाटत होते. आपल्या प्रतिष्ठेसाठी, स्वार्थासाठी आपली कन्या माधवी हिला दानात अर्पण करतो. बापाने लेकीचे कन्यादान करायचे असते. तिच्या आवडत्या माणसाबरोबर तिच्या हक्काच्या घरी पाठवायचे असते. महाराज माधवीचे असलेले हक्काचे घरही हिरावून घेऊन तिला याचकाला दानात देतात. ययाती शूरवीर असूनही दुर्गुणांनी भरलेला होता. तो दृष्ट वृत्तीचा होता. ययातीमध्ये स्वार्थीपणा, निर्लज्जपणा, बेरकीपणा, भोगलोलूपता, विषयलंपटता इ. दुर्गुण होते. स्वत:च्या सुखासाठी, स्वार्थासाठी मुलांच्या सुखाची आहुती देण्याची नीच वृत्ती त्याच्यात होती. जो आपले सुख पाहतो तो त्यासाठी दुसऱ्याच्या सुखाचा बळी देण्यास मागेपुढे पाहत नाही. असा ययाती होता. ययाती ही व्यक्तिरेखा वाचकांच्या मनाला अस्वस्थ करते. ययातीचे विविध पैलू कादंबरीत लेखिकेने चित्रित केले आहेत.

**वसिष्ठ :-**

प्राचीन ग्रंथातून 'वसिष्ठ' नावाचे जे उल्लेख आढळतात त्यातीलच एका वसिष्ठांचा उल्लेख या कादंबरीत आला आहे. उर्वशीमुळे मित्रावरूणांच्या तेजाने कुंभ अथवा कमल यातून वसिष्ठ जन्मास आला असे म्हटले जाते. वसिष्ठ विश्वामित्रांचे भांडण ऋग्वेदातही आढळते. वसिष्ठ हे ज्ञानी, प्रयोगशील, आत्मरत, स्वाभिमानी होते. वसिष्ठ सुदासांचे पुरोहीत होते. त्यामुळेच वसिष्ठ व विश्वामित्र यांच्यात वैमनस्य उत्पन्न झाले होते. कर्दम प्रजापतीची कन्या अरूंधती आणि दक्षकन्या उर्जा या त्याच्या पत्नी होत्या. कामधेनूच्या साहाय्याने वसिष्टाने विश्वामित्राचे आपल्या आश्रमात उत्तम स्वागत केले. तेव्हा विश्वामित्र ह्यांच्याकडे कामधेनूची मागणी करतात. ती वसिष्ठ नाकारतात. वसिष्ठ-स्मृती, वसिष्ठ-तंत्र, वसिष्ठ-पुराण इत्यादी ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. या ग्रंथाची मागणी विश्वामित्रांनी रंभेच्या मार्फत अरूंधतीमातेकडे केली व ते ग्रंथ मिळवून त्याचा अभ्यास केला व वसिष्ठांसारखे ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केला. वसिष्ठ व विश्वामित्र यांच्यात सतत संघर्ष

चालू होता. वसिष्ठांच्या आश्रमातील धान्य विश्वरथाने चोरले होते. त्यामुळे वसिष्ट त्याच्यावर खूप चिडले होते.

वसिष्ठांना माहीत असलेले ज्ञान त्यांनी इतरांना सांगावे असे विश्वामित्रांना वाटते. मात्र त्यांच्या या बोलण्यावर वसिष्ठ म्हणतात, ''नाही हे फक्त माझे आहे. इतरांना हवे तर त्यांचे त्यांनी पहावे.''[१५] त्यांच्या या उद्‌गारावरून त्यांना आपल्या ज्ञानाचा किती अहंकार होता हे लक्षात येते. सत्यव्रताला दोषी ठरवून त्याचे राज्य वसिष्ठांनी स्वत:च्या ताब्यात घेतले होते व त्याच्याबद्दल लोकांमध्ये अनेक गैरसमज पसरवून देण्याचे काम वसिष्ठ करत होते. लोकांनाही त्यांचे म्हणणे खरे वाटत होते. विश्वरथाने त्याला न्याय मिळवून देऊन त्याचे राज्य परत मिळवून दिले होते. मात्र वसिष्ठ लोकांना म्हणतात, ''सत्यव्रताला प्रायश्चित घेण्यासाठी आपणच पाठविले होते. आत्ता तो प्रायश्चित घेऊन परतला आहे. त्याचे राज्य सांभाळण्यास तो समर्थ आहे.''[१६] यावरून वसिष्ठ लोकांच्यासमोर स्वत:ला दोषी न ठरवता महान बनण्याचा प्रयत्न करत होते.

'अश्वदा' या कादंबरीतील वसिष्ठ ही व्यक्तिरेखा लेखिकेने अतिशय सुंदररित्या चित्रित केली आहे. ही व्यक्तिरेखा कधी चांगले वागत असते तर कधी कधी वाईट वागूनही चांगले वागत असल्याचे दाखवत असते.

**बिंदुमती :-**

बिंदुमती ही ययाती महाराजांच्या दरबारातील प्रमुख व विश्वासू दासी होती. बिंदुमती एक बुद्धिमान व व्यवहारकुशल स्त्री होती. ती महाराजांची आवडती दासी होती. माधवीची ती दूधमाय होती. माधवीचा सांभाळ तिने स्वत:च्या मुलीप्रमाणे केला होता. माधवीचे सर्व हट्ट ती पुरवत होती. माधवीची प्रत्येक गोष्ट बिंदुमतीकडून महाराजांना समजत होती. माधवी विवाहयोग्य झाली आहे असे बिंदुमती महाराजांना सांगते. त्यावेळी महाराज तिच्या स्वयंवराची कल्पना करतात. मात्र माधवीच्या नशिबी हे भाग्य नव्हते. माधवीचे कन्यादान

करायचे ठेवून महाराजांनी तिला दानात अर्पण केले होते. त्यावेळी बिंदुमतीला फार दु:ख होते. ती रागाने बेभान होते. महाराजांच्या पायावर डोके ठेवून ती अक्षरश: गडागडा लोळत होती. ती महाराजांना म्हणते, ''माधवीचे प्रयाण थांबवा महाराज. तुम्हीच तिच्याकडे अशी पाठ फिरवलीत तर कोण आहे तिला ?''[१७] बिंदुमतीचा आक्रोश विदुषक पाहत होता. विदुषकालाही ती विनवणी करत होती. मात्र बिंदुमती माधवीसाठी काहीच करू शकली नव्हती.

माधवी लहान असताना माधवीच्या तोंडून काही अपशब्द बाहेर पडले तर माधवी तिला रागावत असे. बिंदुमती तिला म्हणत असे की, ''हज्जारदा सांगितले हिला शुभ बोलावे. अष्ट दिशांतून अष्टदेवता सतत तथास्तु म्हणत असतात तुमच्या कोणत्या वांछेला त्या तथास्तु म्हणतील याचा काही नेम असतो का ?''[१८] माधवीची ती सतत काळजी घेत असते. माधवीचे दान केल्यानंतर तिच्या प्रस्थानाअगोदर सर्वजण तिला भेटायला आले होते. मात्र शर्मिष्ठा व बिंदुमती यांच्याकडे तिला निरोप देण्याचे धाडस नव्हते. प्रस्थानाला सुरूवात झाल्यानंतर त्या दोघी गंगेच्या घाटावर तिला निरोप द्यायला जातात. बिंदुमती माधवीला कवेत घेते. जरीकाठाची एक कंचुकी आणि उमामहेश्वराची एक संगमरवरी मूर्ती तिच्या हाती देत बिंदुमती म्हणाली, ''त्या नीलकंठालाही तुझा पुत्र होण्याचा मोह व्हावा अशी आहेस तू. तो काय तुझे दु:ख शोषून घेणार गं ? पण स्त्रियांच्या दु:खाची जात आणि सोसण्याचे बळ त्यालाही कळावे म्हणून पाठवते आहे तुझ्याबरोबर त्याला. आणि ही कंचुकी. तिच्या रूतण्याचे संदर्भ आणि अर्थ समजावून घेताना तुला पूर्णत्व यावे म्हणून देते आहे बरोबर तुझ्या.''[१९] माधवी जात असताना बिंदुमतीला फार दु:ख होते. मात्र स्वत:च्या दु:खाला आवर घालून ती माधवीला धीर देते.

एका कणखर, व्यवहारकुशल, बुद्धिमान अशा बिंदुमतीची व्यक्तिरेखा लेखिकेने साकार केली आहे. बिंदुमती वाचकांच्या मनाला भावते. कारण ती आपले कर्तव्य

यशस्वीरित्या व प्रामाणिकपणे पार पाडत असते.

**रंभा :-**

रंभा ही व्यक्तिरेखा एक अप्सरा होती. या अप्सरेचे वास्तव्य स्वर्गात होते. स्वर्गातील देवांना केवळ दर्शनानेच भुरळ पडावी अशी ही अप्सरा होती. या रंभेला विश्वामित्र खूप आवडत होते व आपले उरलेले जीवन त्यांच्याबरोबर व्यतीत करावे असे तिला वाटत होते. मात्र विश्वामित्रांनी तिच्या या गोष्टीला नकार दिला होता. तरीही ती त्यांच्यावर खूप प्रेम करत होती. त्यांच्या प्रेमात तिची अवस्था दयनीय झाली होती. याच रंभेने विश्वामित्रांना अभ्यासासाठी वसिष्ठांकडून ग्रंथसंपदा आणून दिली होती. त्यामुळे विश्वामित्र नवीन विचारांची मांडणी करू शकले होते. रंभेने त्यांना खूप मदत केली होती. तिच्या दयनीय अवस्थेला विश्वामित्र कारणीभूत होते. त्यांच्याशिवाय आयुष्य ही कल्पनाच तिला असह्य वाटत होती. ती म्हणते, ''तुमच्याखेरीज आयुष्य म्हणजे मृत्यू. तुमच्याशिवाय जगणं म्हणजे सत्वशून्यत्व, तुमच्याव्यतिरिक्त जग म्हणजे शून्य.''[२०]

विश्वामित्रांना रंभेची अवस्था पाहून काय करावे समजत नव्हते. त्यांनी रंभेला आधार द्यायचा ठरविला होता. त्यासाठी गरूडाला रंभेला घेऊन येण्यास सांगतात. आश्रमाच्या बाहेर तिच्यासाठी झोपडी तयार करतात. एके दिवशी पहाटे मुसळधार पाऊस पडतो. त्यात रंभेची झोपडी मोडते. त्यामुळे ती आश्रमात येते. विश्वामित्र तिला येण्याचे कारण विचारतात व रंभेला म्हणतात, ''आत्म्याला झोपडीचे बंधन कशाला रंभा ? तू मुक्त आहेस कुठेही जाऊ शकतेस तू !''२१

विश्वामित्रांच्या या बोलण्यावरून रंभा जाण्यास निघते. जाताना जास्वंदीची फुले विश्वामित्रांच्या पायावर ओतते. त्या फुलांच्या ओलसर स्पर्शाने विश्वामित्रांना काहीतरी हलल्यासारखे वाटते. आपल्या वस्त्राने त्यांची पावले पुसून त्या पावलांवर रंभा डोके व ओठ टेकवते. जाताना ती विश्वामित्रांना म्हणते, ''मी नमस्कार केला तो विश्वामित्रांच्या

प्रतिभेला आणि पावलांवर मी ओठ टेकवले ते माझ्याविषयी क्षणभर का होईना विश्वरथाला वाटलेल्या आकर्षणाच्या भावनेतून त्याला मुक्त करण्यासाठी. 'मुक्ती' किती छान शब्द आहे नाही ? अग्नीने सीतेला मुक्ती दिली नाही. ती दिली जमिनीने. या धरणीने. शेवटी अग्नीही पुरूषच. पण मी तुला मुक्त करते आहे. माझ्या सगळ्या भावनांचा गुंता मी तोडून दिला आहे.''[२२]

गरूडाला बोलावून तिला अबुदाचलावर पोहचविण्याची व्यवस्था विश्वामित्रांनी केली होती. विश्वामित्रांनी तयार केलेला महामंत्र जाताना तिला देतात. लेखिकेने ही व्यक्तिरेखा प्रभावीपणे मांडली आहे. तिचे निःस्वार्थी प्रेम वाचकांच्या हृदयाला भिडते.

**शीलवती :-**

शीलवती ही गाधीराजाचा पुत्र विश्वरथ याची पत्नी होय. या विश्वरथाला ब्रह्मर्षी होण्याचे वेड लागले होते. त्यासाठी तो कान्यकुब्ज सोडून ज्ञान मिळविण्यासाठी भटकंती करतो. त्यासाठी अरण्यात जाऊन तपश्चर्या करतो. भरपूर ज्ञान संपादन करतो आणि या विश्वरथाचा विश्वामित्र होतो. कान्यकुब्ज सोडून जाताना तो शीलवती मातेला व पुत्र गालवाला अयोध्येत सोडून जातो. माता शीलवती सत्यव्रताच्या मदतीने गालवाला घेऊन कान्यकुब्जेला येते व विश्वामित्र परत आल्यानंतर त्यांचे स्वागत मोठ्या उत्साहाने करते. विश्वामित्र राज्य सोडून आश्रमात जातात. त्यावेळी शीलवती माता देखील आश्रमातच रहायला जाते. तिला गादीचा मोह वाटत नाही. ती आश्रमातल्या मुलांवर आपल्या पुत्राप्रमाणेच प्रेम करत होती. विश्वामित्रांची ती नीट व्यवस्था पहात असे. ती एका राजाची पुत्री, एका राजाची पत्नी होती. मात्र आश्रमात आल्यानंतर ती फक्त माता झाली होती. तीही सर्व आश्रमवासीयांची. कधीही ती हट्ट करत नव्हती. तिला कोणताही हव्यास नव्हता.

विश्वामित्रांमुळे माधवीची जी दयनीय अवस्था होते, त्यामुळे शीलवती मातेला फार दुःख होते. स्त्रीवर होणारा अन्याय तिला सहन होत नाही. तिला माधवीची चिंता

वाटत होती. ती विश्वामित्रांना म्हणते, ''एका सम्राटाची कन्या एका ऋषीबरोबर प्रतिष्ठानापासून अयोध्येपर्यंत येते. तीही बिनतक्रार. स्त्री म्हणून देहधर्म, भोग आहेतच. पण सारे सोसते. स्वत:च्या बापाच्या मोठेपणासाठी आणि समस्त पुरूष जात पाहत राहते सारे. तिला काही विटाळ, चांडाळ, ज्वरा, वेदना नसतील होत ?''[२३] तिच्या या बोलण्याने वसिष्ठांसमोर मोठमोठे वाद जिंकलेला विश्वरथ हरल्यासारखा झाला होता. तिच्या बोलण्यावरून विश्वरथाला असे वाटत होते की, एवढ्या वर्षात जे बोलता आले नाही ते माधवीच्या निमित्ताने शीलवती बोलत होती.

विश्वामित्रांमुळे माधवीला तीनदा विनिमय करावा लागतो. तिच्या या अवस्थेला विश्वामित्रांना ती कारणीभूत मानत होती. ती विश्वामित्रांना त्याबद्दल जाब विचारते. ती म्हणते, ''गालवाने आठशे अश्व असे आणून दिले तर चालतील तुम्हांला ? हा कसला विजय महाराज ? एका स्त्रीचा बाजार भरवून तुम्ही स्वत:चे ब्रह्मत्व सिद्ध करणार आणि तुमचा तो पुत्र त्यासाठी तुम्हांला मदत करणार. काय फरक आहे तुमच्यात आणि वसिष्ठांच्यात. राजसत्तेपेक्षा ब्रह्मसत्ता श्रेष्ठ असे सिद्ध करण्याच्या नेहमी प्रयत्नात असतात ना वसिष्ठ? त्यांच्याबरोबर शह देता देता तुम्हीही त्यांच्यासारखेच झालात की काय ?''[२४]

शीलवती माता विश्वामित्रांवर रागावून आश्रम सोडून पुन्हा कान्यकुब्जला आपल्या पुत्राकडे निघून जाते. शीलवती संयमी व विवेकी अशी व्यक्तिरेखा आहे.

**अरूंधती :-**

कर्दम प्रजापती व त्याची पत्नी देवहुती यांची कन्या आणि वसिष्ठ ऋषींची पत्नी अरूंधती होय. ही वसिष्ठांना सोडून कधीही नसते. वसिष्ठांना ती कधीच विरोध करीत नाही म्हणून हिचे नाव अरूंधती पडले असे महाभारताच्या अनुशासन पर्वात दिले आहे. अरूंधती माता स्वभावाने गुणवान अशी स्त्री होती. वसिष्ठांचा स्वभाव फार रागीट व अहंकारी होता. मात्र त्याचा परिणाम अरूंधती मातेवर कधीच झाला नाही. विश्वामित्रांशी

वसिष्ठांचे फार वैर होते. मात्र अरूंधती मातेला विश्वामित्र पूजनीय मानत होते. ''अरूंधती मातेची पतिसेवा व तपस्या इतकी श्रेष्ठ होती की स्वाहा देवीला देखील मातेचे रूप धारण करणे अशक्य झाले. हिच्या तपस्येने शंकर अतिशय संतुष्ट झाला व त्याने हिला दर्शन देऊन वर दिला. हिने जेथे तपश्चर्या केली ते स्थळ 'बदरपाचन' ह्या नावाचे पवित्र तीर्थक्षेत्र झाले. तेथे तीन रात्री व्यतीत करणाऱ्यास बारा वर्षाच्या उपवासांचे फल प्राप्त होते. असे त्याचे महत्त्व सांगितले जाते. सप्तर्षीमध्ये ही वसिष्ठांच्या शेजारी दिसते.''[२५] शक्ती हा अरूंधती व वसिष्ठ यांचा पुत्र होय.

सुदासांच्या राज्यात विश्वामित्र येतो तेव्हा वसिष्ठ व विश्वामित्र मागचे सर्व वैर विसरतात. त्यावेळी बकुळीची फुले वसिष्ठ विश्वरथाला देतात. ती फुले अरूंधतीमातेने दिली आहेत असे सांगतात. विश्वरथाचे आगमन झाल्यावर अरूंधती मातेला मात्र चिंता वाटते. कारण वसिष्ठ व विश्वामित्र यांच्यात सतत संघर्ष होत असे. मात्र यावेळी तसे काही घडत नाही. त्यामुळे ती निश्चिंत होते. विश्वामित्र अश्वत्थाचे रोप शक्तीला देतात व म्हणतात, ''मला आवडतो अश्वत्थ. हे खरे पण अरूंधतीमातेला सांग मला बकुळीही आवडते. बकुळीचे रोप न्यायला मी येणार आहे आश्रमात.''[२६]

अरूंधती मातेचे पातिव्रत्य, शालीनता, ऋजुता, संयम वाखाणण्यासारखे आहे. आपल्या सद्‌गुणांनी तिने सप्तर्षीमध्ये स्थान पटकावले आहे. अरूंधती ही व्यक्तिरेखा तिच्या महतीने वाचकांच्या मनात घर करून जाते.

**पुरू :-**

प्रतिष्ठानचे सम्राट ययाती व शर्मिष्ठा यांचा पुत्र पुरू होय. पुरूचे आपल्या माता-पित्यांवर खूप प्रेम होते. ययाती महाराजांसाठी काहीही करण्याची तयारी त्याच्याकडे होती हे महाराज जाणून होते. त्यामुळे अश्रूबिंदुमतीच्या हव्यासापोटी आपल्या या पुत्राचे तारूण्य मागतात. पुरूही आनंदाने आपले तारूण्य पित्याला देऊन टाकतो. त्यामुळे पुरू दिवसेंदिवस

म्हातारा होत चालला होता. त्याच्यातील या बदलामुळे त्याची पत्नी चित्रलेखा फार दु:खी झाली होती. या दु:खातच तिचा मृत्यू झाला होता. चित्रलेखेच्या मृत्युमुळे पुरूला जख्ख म्हातारा बनविले होते. या सर्वांना ययाती महाराज कारणीभूत होते. मात्र तरीही पुरूने त्यांच्यावर त्याचा राग काढला नाही व आपले कर्तव्य पार पाडत राहिला. आपल्यावर झालेल्या अन्यायाबद्दल त्याने कोणालाच दोष दिला नाही. आपले प्राक्तन समजून तो जगत राहिला. मात्र स्वत:च्या प्रतिष्ठेसाठी माधवीचे दान ययाती महाराज करतात. त्यावेळी माधवीला म्हणतो, ''रडू नकोस मधु. मी विरोध करेन तातांना. ही माधवी कोणा गालवाला दानात देण्यासाठी जन्माला आलेली नाही.''[२७] त्यावेळी तो माधवीला समजावतो. मात्र महाराज आपला निर्णय बदलणार नाहीत याची खात्री त्याला होती. या गोष्टीला कसा विरोध करावा या विचाराने पुरू अस्वस्थ झाला होता. मात्र तो काहीही करू शकत नव्हता.

पितृप्रेमापोटी त्याने आपले तारूण्य ययातीला दिले होते. त्याबदल्यात महाराजांनी पुरू हा कनिष्ठ पुत्र असूनदेखील त्याचा राज्याभिषेक करून त्याला राज्यपद स्वाधीन केले होते. पुरूची त्यागीवृत्ती, कर्तव्यनिष्ठा, पितृप्रेम लेखिकेने कादंबरीत चित्रित केले आहे. एक आज्ञाधारक पुत्र म्हणून पुरू वाचकांच्या मनात वरचे स्थान निर्माण करून जातो.

या कादंबरीमध्ये मुख्य पात्रांबरोबर अनेक गौण पात्रेही येताना दिसतात. त्यातील काही पात्रांचे महाभारतात मोठे स्थान असले तरी कादंबरीत त्या व्यक्तिरेखा या मुख्य व्यक्तिरेखेभोवती डोकावताना दिसतात. त्यामध्ये देवयानी, शर्मिष्ठा, चित्रलेखा, विदुषक, हर्यश्व, उशीनर, दिवोदास, शुन:शेप, जमदग्नी, ब्रह्मर्षी, धर्मऋषी, गरूड, तारामती, उलूक, मोहिनी, दृषद्वती, सहदेव, गार्ग, शक्ती, विधी अशा अनेक व्यक्तिरेखा कादंबरीत येतात. ही गौण पात्रे असली तरीही त्यांचे कादंबरीतील स्थान मोलाचे आहे. मुख्य व्यक्तिरेखेभोवती या लहानसहान व्यक्तिरेखा सतत आल्यामुळे कादंबरी उठावदार बनली आहे. ठसठशीत

व्यक्तिरेखा, त्यांच्या अंतर्मनातील खळबळ, त्यांचे विचार, आचार, बोलणे, स्वभाव इत्यादींचे चित्रण लेखिकेने समरसून केले आहे.

**तत्कालीन स्त्री-जीवन :-**

महाभारतकालीन स्त्रियांना मनाप्रमाणे वागता येत नसे. पुरूषांचे विचार व निर्णय त्यांच्यावर लादले जात होते. तिच्याकडे सामर्थ्य, शक्ती असूनही स्वतंत्र विचाराने वागता येत नव्हते. सदैव पुरूषांच्या आज्ञेत रहावे लागत होते. पिता, बंधू, पती व पुत्र यांच्याच हातात स्त्रीच्या दोऱ्या होत्या. ते नाचवतील तसे तिला कळसूत्री बाहुलीप्रमाणे नाचावे लागत होते. मनाविरूद्ध अनेक गोष्टी कराव्या लागत होत्या. एकूणच पुरूषसत्ताक पद्धती आजच्यासारखी पूर्वीही होती. पतीने कितीही व्यभिचार केला तरी तो सहन करावा लागत होता.

महाभारतातील प्रसिद्ध सम्राट म्हणजे ययाती सामर्थ्यवान सम्राट होता. देवयानी या शुक्राचार्यांच्या मुलीशी त्याने विवाह केला होता. त्याचबरोबर तिची दासी शर्मिष्ठा हिच्याशीही त्याने विवाह केला होता. देवयानी व शर्मिष्ठा यांना यदु व पुरू हे दोन पुत्र झाले होते. देवयानीच्या विरोधामुळे शर्मिष्ठेला प्रतिष्ठान सोडून पलायन करावे लागते. तिचा सम्राटाशी विवाह होऊन एका राजपुत्राची आई असताना देखील नियतीचा निर्णय तिला मान्य करावा लागला होता. एक राणी असूनदेखील तिला दुःखाला सामोरे जावे लागते. शर्मिष्ठा गेल्यानंतर महाराज मदिरेच्या आहारी गेले होते. देवयानीने कितीही विरोध केला तरी ययाती महाराज मदिरा प्राशन करतच होते. रोज एका स्त्रीबरोबर ते आपली रात्र घालवीत होते. त्या स्त्रियाही विरोध न करता ययातीची शय्यासोबती म्हणून रात्र काढत होत्या. राजापुढे स्त्रियांना किती हीन दीन, लाचार व्हावे लागत होते. हे या कादंबरीतून प्रतीत होते.

ययाती महाराजांना अश्रूबिंदुमती आवडली होती व तिच्यासाठी त्यांनी आपल्या पुत्राचे तारूण्य हिरावून घेतले होते. शर्मिष्ठेला आपल्या पुत्राचे तारूण्य घेतल्यामुळे खूप

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

दु:ख होते. मात्र महाराजांवर असलेले प्रेम व पतीनिष्ठा महत्त्वाची असे समजून तिने महाराजांवर त्याचा कधीच राग काढला नव्हता. आपल्या पतीचे तारूण्य परत मिळविण्यासाठी चित्रलेखा शर्मिष्ठेपाशी खूप विनवण्या करत होती. मात्र शर्मिष्ठा तिची काहीही मदत करू शकत नव्हती व त्यातच चित्रलेखेचा मृत्यु होतो. ययातीकन्या माधवीच्या पित्याकडे आलेला याचक गालव याला तिला दानात अर्पण करतात. माधवीला न विचारता ययातीने तिला दानात अर्पण केले होते. तरीही माधवीने त्याला कसलाही विरोध केला नाही व आपल्या पित्याला तिने निरोप पाठविला की, ''महाराजांना म्हणावे, काशी विश्वेश्वराला आणि पंचमहाभूतांना साक्षी ठेवून ही माधवी आपल्याला अभिवचन देते आहे की पितृकुलाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी आपल्या शरीराच्या अणुरेणूचे दान द्यायलाही ती तयार आहे.''[२८] यावरून त्याकाळची स्त्री ही किती आज्ञाधारक होती हे लक्षात येते. आपल्या मनाचा विचार न करता प्रकृतीचा/नियतीचा निर्णय ती विरोध न करता मान्य करत होती. गालव माधवीला सहाशे अश्वांच्या बदल्यात तीन राजांकडे पुत्र होईपर्यंत ठेवतो व उरलेल्या दोनशे अश्वांच्या बदल्यात गुरूदेवांना माधवीला अर्पण करतो. तरीही त्या गोष्टींना माधवी विरोध करत नाही. ब्रह्मर्षीने तिला पुत्रप्राप्तीनंतर कौमार्य तसेच राहील हे वरदान दिले होते. ब्रह्मर्षीने स्वत:चा प्रयोग यशस्वी करण्यासाठी माधवीचा वापर केला होता. माधवीनेही तो वर जाणून घेण्यासाठी प्रयोग यशस्वी करण्यासाठी तयारी दाखविली होती. वरदानाचा वापर करून ती तीन पुत्रांना जन्म देते. मात्र ती माता होत नाही, कारण पुत्रप्राप्तीनंतर तिच्या शरीरात जो बदल व्हायला हवा होता तो झाला नव्हता. त्यामुळे तिला खूप दु:ख झाले होते. तीन पुत्रांची आई होण्याचे पूर्णत्व लाभले नव्हते. तरीही दु:ख करीत न बसता नियतीने पुढे मांडून ठेवलेल्या नवनवीन समस्यांना सामोरे जाण्यास ती तयार होती. विश्वामित्रांपासून तिला एक पुत्र होतो. त्यावेळी तिला आई झाल्याचे पूर्ण समाधान मिळते. मात्र विश्वामित्र तो पुत्र आपल्याजवळ ठेवून घेतात व तिला पुन्हा प्रतिष्ठानात

सोडून येण्यास सांगतात. तिची गरज संपल्यानंतर तिच्या मनात नसताना तिला प्रतिष्ठानात सोडले जाते. म्हणजेच त्याकाळी स्त्रियांचे मन जाणून घेण्याचा प्रयत्न केला जात नव्हता. त्यांच्या भावना जाणून घेत नव्हते. त्यांना काय हवं आहे हे न विचारता त्यांच्यापुढे निर्णय मांडला जात होता व त्याही विरोध न करता ते मान्य करत असत. त्यामुळे त्याकाळच्या स्त्रिया स्वतंत्र नव्हत्या हे लक्षात येते.

विश्वामित्रांच्या जीवनात रंभा नावाची अप्सरा येते. तिला विश्वामित्र खूप आवडत होते. विश्वामित्रांनी वसिष्ठांचे ग्रंथ मिळविण्यासाठी तिचा वापर केला होता. मात्र तिला कधीच प्रेम दिले नाही. त्यामुळे तिची अवस्था दयनीय झाली होती. माधवीवर होणारा अन्याय शीलवतीला मान्य नव्हता. विश्वामित्र या अन्यायाला जबाबदार असल्यामुळे शीलवती त्यांना सोडून कान्यकुब्जला निघून जाते. बऱ्याच स्त्रियांचे पुरूष हे राजवाड्यात काम करत असत व त्यांच्या स्त्रिया दासी म्हणून काम करत होत्या. अयोध्येत काही स्त्रिया नाटकशाळा चालवत असत. जे राजे व्यसनाच्या आहारी जाऊन राज्यकारभार चालवत नसत त्या राजांच्या राण्या स्वत: जातीने लक्ष देऊन राज्यकारभार सांभाळत होत्या.

प्रतिष्ठानात सर्वत्र स्त्रियांचा कारभार होता. पुष्पवाटिकेत, अन्नछत्रात, पाणपोईत स्त्रिया काम करत होत्या. स्त्रिया मंदिरासमोर रांगोळी काढत होत्या, वृंदावन झाडत होत्या, मण्यामोत्यांचा व्यापार करणाऱ्या स्त्रिया होत्या. अशाप्रकारे तत्कालीन स्त्रियांचे जीवन होते.

**वास्तव व कल्पित अनुभव विश्व :-**

'अश्वदा' ही संध्या देशपांडे यांची पौराणिक कादंबरी आहे. पौराणिक म्हटलं की आपल्याला रामायण, महाभारत या पुराणकथा लक्षात येतात. ही कादंबरी महाभारतातील ययातीची कन्या माधवी हिच्या जीवनावर आधारीत आहे. पुराणकथा म्हटलं की राजा-राणीच्या गोष्टी आठवतात. लहान मुलांना तर या गोष्टी फार आवडतात. त्यांना नुसतं

गोष्टींचं नाव काढलं तरी राजा-राणीची गोष्ट सांगा ना असे पटकन म्हणतात. या गोष्टींबद्दल आपल्या ठराविक अशा कल्पना असतात. जणू काही या राजा-राणीबद्दल आपण एक कल्पना विश्वच निर्माण केलेलं असतं. राजा-राणी म्हटलं की ते खूप श्रीमंत असतात. त्यांचे कपडे हे रेशमी असतात. खाण्यासाठी रोज पंचपक्वान्ने असतात. त्यांच्याकडे खूप दास-दासी असतात. त्यामुळे त्यांचे जीवन हे फार सुखी असते. त्यांना कशाचीही कमतरता नसते. राजा प्रजेवर सत्ता गाजवीत असतो. तो कोणालाही शिक्षा करू शकतो. राजा आपल्यावर खूष झाला तर आपल्याला बक्षीस म्हणून सोन्यामोत्यांचे अलंकार देतो. या राजा-राणींना मुले असतील तर त्यांचेही जीवन फार सुखी असते. राजपुत्र व राजकन्या यांना आपल्या मनाप्रमाणे वागता येते. त्यांना काही काम नसते. त्यांची सर्व कामे दास-दासी करतात. राजपुत्राला राजवाड्यात येऊन गुरू शिक्षण देत असत. त्यांना शास्त्र आणि शस्त्र दोन्हींचे शिक्षण दिले जात असे. राजकन्या असेल तर ती फार सुंदर असते. ती एखाद्या परीसारखी असते. मोठी झाल्यानंतर या राजकन्येचे स्वयंवर केले जाते व तिला आवडेल त्या व्यक्तीशी ती विवाह करते. विवाहानंतर ती राजाची आवडती राणी होते. अशा बऱ्याच कल्पनांचे विश्व आपण आपल्या मनासमोर उभे केलेले असते. त्यातील काही कल्पना या वास्तवात खऱ्या असतात. मात्र काही कल्पना या कल्पनाच असलेल्या दिसून येतात.

राजा हा जरी सर्व सत्ताधीश असला तरी सर्व गोष्टी त्याला राजदरबारातल्या लोकांच्या संमतीनेच घ्याव्या लागतात. काही वेळेला राजाच्या प्रतिष्ठेसाठी राजाला स्वतःचा किंवा घरातल्या व्यक्तींचा बळी द्यावा लागतो हे वास्तव आहे. ययाती हा प्रतिष्ठानचा महाराज आहे. त्याच्याकडे एक याचक आठशे अश्वमेधी अश्वांची मागणी घेऊन येतो. त्यावेळी त्याच्याकडे आठशे अश्व नसतात. मात्र याचकाला रिक्त हस्ताने पाठविले तर प्रतिष्ठानची प्रतिष्ठा धुळीला मिळेल असे त्याला वाटते. त्यावेळी याचकाला रिक्त हस्ताने

न पाठविता आपली कन्या माधवी हिला दानात अर्पण करतात. एक राजा असूनदेखील त्याला वेळप्रसंगी असा कठोर निर्णय घ्यावा लागतो हे कटू वास्तव या कादंबरीतून प्रकट होताना दिसते.

राजकन्येबद्दल सुद्धा आपल्या काही कल्पना असतात. मात्र या कादंबरीतून आपल्याला वास्तवाची जाणीव होते. या कादंबरीची नायिका माधवी ही प्रतिष्ठानची राजकन्या आहे. माधवीला केवळ पित्याचेच प्रेम मिळाले तिला कधी आईचे प्रेम, माया मिळालीच नाही. तिची दूधमाय बिंदुमती हिनेच तिला लहानाचे मोठे केले. राजकन्या विवाह योग्य झाल्यावर तिचे स्वयंवर मांडले जाते. माधवीच्या नशिबी हे स्वयंवर नसते. कारण ययाती महाराज आपल्या प्रतिष्ठेसाठी एका याचकाला तिला दानात अर्पण करतात. एका समर्थ राजाशी तिचे लग्न लावून आठशे अश्व घ्यावेत असे याचकाला सांगतात. मात्र प्रत्यक्षात तसे घडत नाही. माधवीला भयानक अशा दिव्यातून जावे लागते. तिला २०० अश्वांच्या बदल्यात एक पुत्र असा तीनदा विनिमय करावा लागतो व उरलेल्या दोनशे अश्वांच्या बदल्यात ती स्वत:ला विश्वामित्रांच्या स्वाधीन करते व त्यांच्यापासून तिला एक पुत्र होतो. माधवी चार पुत्रांची आई होते. मात्र आई झाल्याचे सुख तिला मिळत नाही. त्या चारही पुत्रांना त्यांच्या पित्याच्या स्वाधीन करून तिला एकटीलाच आयुष्य काढावे लागते. मातेची ममता, वात्सल्य, प्रेम तिला आपल्या पुत्रांना देता येत नाही. ही केवढी मोठी विडंबना आहे माधवीच्या जीवनातली !

राजपुत्राबद्दल आपल्या कल्पना असतात. ययाती महाराजांचा पुत्र पुरू याच्या नशिबी मात्र दु:खच आलेले दिसते. पितृभक्तीमुळे आपले तारूण्य तो आपल्या पित्याला देतो. त्यामुळे त्याला अकाली वृद्धत्व प्राप्त होते. त्याच्यातील या बदलामुळे त्याची पत्नी फार अस्वस्थ होते व त्यातच तिचा मृत्यू होतो. चित्रलेखेच्या मृत्युमुळे पुरू फार खचून जातो. त्यातच भर म्हणजे माधवीला दानात अर्पण करतात. मात्र बंधू या नात्याने तो

तिच्यासाठी काहीच करू शकत नव्हता. एक राजपुत्र असूनदेखील त्याच्याकडे काहीच अधिकार नव्हते हे सत्य आपल्याला या कादंबरीतून स्पष्ट होते. माता शर्मिष्ठा राणी असून आपल्या पतीला विरोध करू शकत नव्हती. आपल्या पुत्राचे दु:ख तिला पहावे लागत होते.

विश्वामित्र हा कान्यकुब्जचा राजा होता. मात्र सर्व ऐश्वर्य सोडून तो वनात निघून जातो. अनेक ठिकाणी प्रवास करतो. तपश्चर्या करून ज्ञान संपादन करतो. हे ज्ञान लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी त्याची सतत धडपड चालू असते. वसिष्ठांशी त्याचा संघर्ष होत असे. राज्यत्याग करून तो आश्रमात राहू लागतो. माता शीलवती कान्यकुब्जची राणी असून देखील आपले आयुष्य आपल्या पतीबरोबर एका आश्रमात काढावे लागते.

हर्यश्व, दिवोदास, उशीनर हे बलवान राजे असतात. त्यांना पुत्रप्राप्ती होत नसते. हे दु:ख त्यांच्या वाट्याला येते. पुत्रप्राप्तीसाठी दोनशे अश्वांच्या बदल्यात माधवीला पुत्र होईपर्यंत स्वत:कडे ठेवतात व त्यांच्या राण्याही या गोष्टीला तयार होतात.

या कादंबरीत रंभा नावाची अप्सरा आहे. अप्सरेत कोणालाही मोहवून टाकण्याचे सामर्थ्य असते. रंभेच्या वाट्याला मात्र दु:ख होते. ती एक अप्सरा असून विश्वामित्रांना तिचा मोह होत नाही. त्यांच्या प्रेमात रंभेची अवस्था व्याकुळ झालेली दिसून येते.

पुराणकथांबद्दल आपल्या मनात अनेक कल्पना असतात. कथा वाचत असताना त्या कल्पना मनात धरूनच आपण वाचन करीत असतो. मात्र प्रत्यक्ष कादंबरी वाचताना या कल्पना खोट्या ठरतात. कादंबरीतून आपल्याला वास्तव किती भयंकर असते हे दिसून येते. आपल्या कल्पनेच्या बाहेरचे वास्तव या कादंबरीत पहायला मिळते. किती दिव्य प्रसंगातून माधवीला जावे लागले आहे हे वास्तव आपण 'अश्वदा'मध्ये अनुभवू शकतो.

**संघर्ष चित्रण :-**

काही काही कलाकृतींचे आवाहन कधीच संपत नाही. महाभारत ही त्यापैकीच एक कलाकृती होय. जी कलाकृती वाचकांसमोर अनेकानेक प्रश्न निर्माण करते ती श्रेष्ठ मानायला हवी. व्यासांनी रेखाटलेली महाभारत ही कलाकृती तत्कालीन समाजवास्तवावर तर प्रकाश टाकतेच, शिवाय वाचकांच्या मनाला अंतर्मुखही करते. मानवी जीवन हे संघर्षमय असल्यामुळे त्याचे प्रतिबिंब साहित्यात पडते. हा संघर्ष विविध पातळ्यांवर पहायला मिळतो. व्यक्ती विरूद्ध परिस्थिती, सत्-असत् प्रवृत्ती यातील संघर्ष साहित्याच्या केंद्रस्थानी असतो. जीवनातील हा संघर्ष नेमकेपणाने टिपण्याचे सामर्थ्य लेखकापाशी असेल तर ती कलाकृती परिणामकारक होते. महाभारत या कलाकृतीत हा प्रत्यय पदोपदी येतो. त्यामुळे पौराणिक विषयांवरती केल्या जाणाऱ्या लेखनामध्येही आपणाला संघर्ष दिसून येतो. 'अश्वदा' मध्येही संघर्ष आलेला आहे. याशिवाय आपल्याकडे जेवढ्या पौराणिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत त्या एका-एका व्यक्तिरेखेभोवती फिरताना दिसतात. व्यक्तीला करावा लागलेला संघर्ष लेखक आपल्या कलाकृतीतून साकार करतात.

उदा. कर्ण - कर्णाच्या जीवनावर अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. त्यामधून कर्णाला आपल्या जीवनामध्ये वेगवेगळ्या पातळ्यांवर जो संघर्ष करावा लागला आहे त्याचे चित्रण लेखकांनी केलेले दिसून येते. पौराणिक काळातील कोणतीही व्यक्तिरेखा अभ्यासल्यास आपल्या असे लक्षात येईल की, प्रत्येक व्यक्तीला संघर्ष करावाच लागलेला आहे. आलेल्या परिस्थितीशी संघर्ष करून नियतीचा निर्णय त्यांनी मान्य केलेला आहे.

आजच्या समाजामध्ये वेगवेगळ्या प्रवृत्तीची माणसे आपणाला दिसतात. परिस्थितीनुसार माणसाला निर्णय घ्यावे लागत असतात. इतरांनाही ते मान्य करावे लागत असतात. समाजात माणूस राजा असो वा भिकारी त्याला अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागत असते. संध्या देशपांडे यांची 'अश्वदा' ही कादंबरी पौराणिक आहे. या कादंबरीतील अनेक व्यक्तिरेखांना आपल्या जीवनात खूप संघर्ष करावा लागला आहे.

माधवी प्रतिष्ठानची एकुलती एक राजकन्या होती. ती दिसायला अतिशय सुंदर होती. स्वर्गातील देवांनाही आकर्षित करण्याची ताकद तिच्यात होती. माधवी लहानपणापासून हट्टी होती. तिचा प्रत्येक हट्ट ययाती पूर्ण करत असत. तिला लहानपणापासून आईचे प्रेम मिळाले नव्हते. तिचा सांभाळ बिंदुमतीने केला होता. म्हणजेच लहानपणापासून प्रेमासाठी तिला संघर्ष करावा लागला होता. माधवी विवाहयोग्य झाली होती व तिचे स्वयंवर करण्याचे स्वप्न राजा पहात होता. त्या विचाराने त्याच्यासमोर आलेल्या संकटांना थोडावेळ त्याला दूर ठेवता आले होते. ते संकट म्हणजे ययातीकडे विश्वामित्रांचा शिष्य गालव हा आपली गुरूदक्षिणा पूर्ण करण्यासाठी आठशे अश्वमेधी अश्वांची मागणी घेऊन आला होता. ययाती महाराजांकडे 'आठशे अश्वमेधी अश्व' नसतात. त्यामुळे महाराज फार चिंताग्रस्त होतात. याचकाला रिक्त हस्ताने पाठविण्याची पद्धत प्रतिष्ठानात नव्हती आणि आता तसे झाले तर प्रतिष्ठानची प्रतिष्ठा धुळीला मिळेल असे महाराजांना वाटत होते. माधवीला पुत्रप्राप्तीनंतर कौमार्य हे वरदान प्राप्त झाले होते व तिला होणारे पुत्र हे चक्रवर्ती सम्राट होणार होते. माधवीचा विचार महाराजांच्या डोक्यात असतानाच याचकाला रिक्त हस्ताने न पाठविता माधवीलाच आपण दानात अर्पण करायचे असा निर्णय त्यांनी घेतला होता. अठरा सहस्त्र अश्वमेधी अश्व मिळविण्याची ताकद माधवीच्यात आहे हे ते जाणत होते. त्यांनी हा निर्णय माधवीला न विचारता घेतला होता. माधवीनेही आपले प्राक्तन समजून निर्णय मान्य केला होता. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची ती कुणाकडेही तक्रार करत नाही. आपले प्राक्तन समजून गालवाबरोबर ती पुढच्या जीवनाच्या प्रवासास ती राज्य सोडून चालू लागते.

प्रतिष्ठानातून बाहेर पडल्यानंतर एका राजाशी अश्वांच्या बदल्यात माधवीचा विवाह करावा असे महाराजांनी गालवाला सांगितले होते. त्यासाठी गालव सुरूवातीला अयोध्यानरेश हर्यश्व महाराजांकडे गेला होता. मात्र तेथे त्याची निराशा होते. कारण हर्यश्व महाराजांकडे

केवळ दोनशेच अश्व होते. त्यामुळे माधवीबरोबर गालवालाही संघर्ष करावा लागत होता. आठशे अश्वमेधी अश्व देणारा एकही राजा गालवाला मिळत नव्हता. गुरूदक्षिणा तर त्याला पूर्ण करायची होती. पुढे काय करायचे हा प्रश्न त्याच्यापुढे उभा होता. माधवीला पुत्रप्राप्तीनंतर कौमार्य तसेच राहील हे वरदान प्राप्त होते. या वरदानाचा वापर करायचा असे गालवाला वाटले, कारण हर्यशव महाराजांना पुत्र हवा होता. माधवी त्यांना पुत्र देऊ शकत होती आणि वरदानामुळे तिचे कौमार्यही अबाधित राहणार होते. तिला होणारे पुत्र चक्रवर्ती सम्राट बनणार होते. त्यामुळे दोनशे अश्वांच्या बदल्यात एक पुत्र असा सौदा हर्यश्व महाराजांशी गालवाने केला व एक पुत्र होईपर्यंत माधवीला अयोध्येत सोडून उरलेल्या सहाशे अश्वांच्या शोधात गालव पुढच्या प्रवासास निघून जातो.

अयोध्येत धर्मारण्यात माधवीसाठी एक राजवाडा तयार केला जातो व तेथे माधवीला ठेवले जाते. ब्रह्मर्षींनी तिला हे वरदान दिल्यामुळे हर्यश्व महाराज तिच्याकडे येणार होते. त्यादिवशी ब्रह्मर्षी तेथे येतात. महाराज मदिरा पिऊन झोपी जातात. त्यानंतर ब्रह्मर्षी आपले काम करतात व माधवीचा गर्भ एका गर्भागारात सुरक्षित वाढेल अशा ठिकाणी ठेऊन निघून जातात. दिवस पूर्ण झाल्यानंतर ते परत येतात. त्यावेळी त्यांचा प्रयोग यशस्वी झालेला असल्याने त्यांना आनंद होतो. या सर्वात माधवीला मात्र अनेक गोष्टींना तोंड द्यावे लागत होते. माधवीला दिवस गेले आहेत हे सर्वांना कळालेले असते. मात्र तिचा गर्भ तिच्या पोटात न वाढता गर्भागारात वाढत आहे हे कुणाला माहीत नसते. त्यामुळे तिच्या शरीरात काहीच बदल होत नसतो. त्यामुळे ते सर्वांपासून लपवून ठेवणे तिला अवघड जात होते. त्यासाठी ती राजवाड्यात एकटी राहण्याचा निर्णय घेते. राजवाड्यातील सर्व दासदासींना नगरातल्या राजवाड्यात परत पाठवून देते व सर्वांना तेथे येण्यास मनाई करते. पुत्र झाल्यानंतर ती त्याला छातीशी धरते. मात्र तिला पान्हा फुटत नाही. त्यामुळे तिला फार दुःख होते. ती मोठ्यांदा आक्रोश करते. दोन दिवस एकांतात ती खूप आक्रोश करते. तिसऱ्या दिवशी

हर्यश्व महाराजांना निरोप पाठवून पुत्राला त्या पती-पत्नीच्या स्वाधीन करते. त्यावेळी तिच्या डोळ्यांतून एकही अश्रू बाहेर पडत नाही. याचे आश्चर्य दृषद्वतीला वाटते. मात्र दोन दिवस खूप आकांत केल्याने तिच्या डोळ्याचे पाणीच आटलेले असते. दृषद्वती माधवीला विचारते, "तुला आणखी काही हवे आहे माधवी ?"[२९] त्यावर माधवी हसते व तिला म्हणते, "माझे सर्वस्व तुमच्या स्वाधीन करून चालले आहे. यापेक्षा महत्त्वाचे काही आहे तुमच्याकडे मला द्यायला ?"[३०] तिचे हे शब्द जिव्हारी लागण्यासारखे आहेत. त्या पुत्राचे नाव ते वसुमन ठेवतात. "वसुमनाला नीट सांभाळ येते मी." असे सांगून माधवी गालवाबरोबर निघण्यास तयार होते. त्यावेळी तिच्या नजरेला नजर देण्याचे धाडस गालवात नव्हते.

अयोध्येनंतर गालव काशीला गेला होता. तेथील दिवोदास महाराज पुत्रप्राप्तीसाठी पुत्रकामेष्ठी यज्ञ करणार होते. त्यावेळी गालव त्यांना भेटतो व माधवीबद्दल सांगतो. पुन्हा एकदा माधवीला पुत्रप्राप्तीच्या दिव्य प्रसंगाला सामोरे जावे लागते. दिवोदास महाराजांना माधवी आवडते. तिला आपली राणी करून घ्यायचा त्यांचा विचार होता. मात्र माधवी त्याला नकार देते. काशी आणि त्यानंतर भोज नरेशांकडे राहून माधवी प्रत्यर्दन आणि शिबी या दोन पुत्रांना जन्म देते. पुत्रांना त्यांच्या स्वाधीन करून गुरूपौर्णिमेच्या आदल्या दिवशी ते दोघे आश्रमात पोहोचतात. अशाप्रकारे माधवी व गालवाचा प्रवास संघर्ष करण्यातच गेला होता. सहाशेच अश्व गालवाला मिळाले होते व उरलेल्या दोनशे अश्वांच्या बदल्यात गालव माधवीला गुरूदेव विश्वामित्रांना अर्पण करतो. त्यावेळी गुरूदेव माधवीला प्रतिष्ठानात सोडून येण्यास सांगतात. माधवी मात्र या गोष्टीला तयार होत नाही. तिला सौदा पूर्ण करायचा होता. विश्वामित्रांकडे ती पुत्राची मागणी करते. तिला तिच्या पोटात वाढणारा माधवी व विश्वामित्रांचा पुत्र हवा असतो. त्यावेळी विश्वामित्र तिला म्हणतात, "हा माझ्यावर सूड उगविण्याचा प्रयत्न आहे, असे वाटत नाही तुला ?"[३१] त्यावर माधवी खूप

संतापते त्या दोघांमध्ये वैचारिक मतभेद होतात. माधवी त्यांना म्हणते, ''तुम्ही काहीही म्हटले तरी आता त्याचा काही उपयोग नाही. मी धूर्त आहे. मी तुमची शत्रू आहे. मी तुमच्यावर सूड उगवते आहे. मी प्रतिष्ठानची पाठराखण करते आहे. काय हवे ते म्हणा. यातले खरे एवढेच आहे की, मी स्त्री आहे. मला मातृत्व हवे आहे. या वांझपणाचा मला वीट आला आहे. या शरीराची रचना मला बदलायला हवी आहे. मी सुंदर नाही दिसले तरी चालेल. माझे स्तन ओघळले तरी चालतील. केस गळाले तरी चालतील, पण मला स्त्रीत्व हवे आहे. मातृत्व हवे आहे.''[३२] यावरून माधवीच्या मनात पुत्रप्राप्तीसाठी जो संघर्ष चालला होता तो आपल्याला समजतो. विश्वामित्र तिची इच्छा पूर्ण करतात. त्यावेळी माधवीला खरे शरीरसुख काय असते ते समजते. विश्वामित्र पुत्र होईपर्यंत माधवीला आश्रमाबाहेर पर्णकुटी बांधून तेथे ठेवतात. त्यावेळी ते माधवीला म्हणतात, ''या पर्णकुटीत तू माझ्या पुत्राला जन्म देशील आणि मी येऊन त्याला घेऊन जाईन. त्यानंतर तुझी तू स्वतंत्र असशील. तू काहीही करावेस, कुठेही जावेस, हा आश्रम सोडून, गालवाने तुझ्याशीही करार तसाच केला होता आणि माझ्याशीही. दोनशे अश्वांच्या बदल्यात एक पुत्र. मला हा पुत्र दिलास म्हणजे दोनशे अश्व पोहोचले. गालवही माझ्या ऋणातून मुक्त झाला आणि तूही गालवाच्या ऋणातून. खरे ना ? असेच म्हणाली होतीस तू. तुला पुत्र हवा. होईल. तुझ्या रक्तामांसाचा. तुझ्या ओटीपोटात वाढणारा पुत्र होईल. त्या दिवशी हा सहदेव येऊन त्याला घेऊन जाईल. तुझी इच्छा मी पूर्ण केली आहे माधवी ?''[३३] विश्वामित्रांच्या या संभाषणावरून माधवीचा स्वत:च्या स्वार्थासाठी वापर करून तिला कसे आपल्या पुत्रांपासून वेगळे केले जाते हे लक्षात येते. माधवीने एवढे अग्नीदिव्य पार केले. शेवटी मात्र तिला एकटीलाच जावे लागले. ती विश्वामित्रांना म्हणते, ''नरपशू आहात सारे नरपशू ! सारी पुरूष जातच पशू आहे. लचके तोडता येतात तुम्हाला. डागण्या देता येतात. फुंकर घालता येत नाही दु:खावर ! सगळ्यांनी माझे मन ओरबाडले. तू शरीरही ओरबाडलेस तरी तुम्ही ब्रह्मर्षी, माधवी कुलटा !''[३४]

माधवीच्या मनातील हुंकार तिच्या बोलण्यातून बाहेर पडत होता. तिच्या मनात जो संघर्ष चालला होता तो विश्वामित्रांसमोर व्यक्त करते. पुत्र झाल्यानंतर सहदेव तो पुत्र घेऊन विश्वामित्रांकडे येतो. त्या पुत्राचे नाव अष्टक ठेवण्यात येते. त्यानंतर माधवीला प्रतिष्ठानात सोडून येण्यास सांगितले जाते. चार पुत्रांची आई होऊन देखील माधवीपाशी एकही पुत्र रहात नाही. त्यामुळे तिचे दुःख हे फार मोठे आहे. शेवटपर्यंत तिच्या वाट्याला दुःख आणि संघर्षच आला आहे. गुरूदक्षिणा पूर्ण होईपर्यंत माधवीचा व गालवाचा संघर्ष हा चालूच असतो.

विश्वामित्र हे गाधीराजानंतर गादीवर बसतात. ते कान्यकुब्जचे सम्राट होतात. मात्र त्यांना या सर्व गोष्टी नको असतात. शिकारीला गेलेला असताना तो वसिष्ठांच्या आश्रमात मुक्काम करतो. आश्रमाच्या बंद ओवरीत काय चालले आहे हे विश्वरथाला जाणून घ्यायचे होते. मात्र वसिष्ठ त्याला विरोध करतात. विश्वरथ त्यांना म्हणतो, ''हे सारे तुम्ही इतरांना का नाही सांगत ? गुरूदेव हे ज्ञान मला दिलेत तर मी त्याचा सर्वत्र प्रचार करेन. हवे तर धनसंपत्ती घ्या. माझे राज्य घ्या. हे कार्य फार महत्त्वाचे आहे. त्याचा साऱ्या मानवजातीच्या कल्याणासाठी उपयोग होऊ द्या.''[३५] यावरून विश्वरथाच्या मनात समाजासाठी किती तळमळ आहे हे लक्षात येते. समाजासाठी काहीतरी करायचे असे त्याला वाटत असते. वसिष्ठ मात्र त्यांचे ज्ञान इतरांना देण्यासाठी तयार नसतात. विश्वरथ गप्प बसत नाही. तो आपल्या सैन्याला वसिष्ठांच्या शिष्यांवर लक्ष ठेवून तेथील बी-बियाणे घेऊन येण्यास सांगतो. त्या बियांची लागवड करून नवे बी काढण्यास सांगतो. वसिष्ठांशी वैर घेतल्यामुळे विश्वरथाचे मन त्याला खायला उठते. माफी मागायला गेले तर ते आपल्याशी कसे वागतील असे त्याला वाटते. चोरी ही वाईटच. अशी सारखी तडफड विश्वरथाची होऊ लागते. आपण ब्रह्मर्षी व्हावे असे त्याला वाटते व तसा तो निश्चय करतो व आपला राज्यत्याग करून तो कोणालाही न सांगता कान्यकुब्ज सोडतो. ते सोडत असताना त्याला अनंत यातना होतात. क्षत्रियाचा कुळधर्म बाजूला सारून नवे आचारविचार स्वीकारताना त्याला

खूप कठीण जात असते. रात्रंदिवस विचार करून तो अखेर एका निष्कर्षाला येतो, तो म्हणजे, ''आत्मनो भोगायतनम् शरीरम्'' आत्म्याचे भोगस्थान म्हणजे शरीर.

काही दिवसांनी विश्वामित्र राज्यात जाण्याचा निर्णय घेतो. जाताना तो अयोध्येत येतो. अयोध्येत वसिष्ठ असतात. अयोध्येचा सम्राट सत्यव्रत याच्यावर त्रिदोष मारून त्याला त्यांनी हद्दपार केलेले असते. त्याच्या बापाला तपश्चर्येला पाठविलेले असते. पुन्हा एकदा वसिष्ठांशी वैर घेऊन तो सत्यव्रताला न्याय मिळवून देतो आणि तो तेथून निघून जातो. विश्वरथाचा पाणउतारा करण्याची एकही संधी वसिष्ठ सोडत नव्हते आणि प्रत्युत्तर देण्यात विश्वरथही कधी कमी पडत नव्हता.

सत्यव्रताच्या राज्यात यज्ञासाठी वसिष्ठ व विश्वामित्रांना बोलविले जाते. त्यावेळीही वसिष्ठ व विश्वामित्रांच्यात संघर्ष होतो. सत्यव्रताच्या मृत्यूनंतर हरिश्चंद्र यांना अयोध्येचे सम्राट केलेले असते. त्यावेळीही वसिष्ठ तेथील कारभार सांभाळत असत. हरिश्चंद्र आजारी पडतात. त्यावेळी त्या यज्ञात ब्राह्मणाचा पुत्र शुन:शेप याचा बळी दिला जाणार होता. विश्वामित्रांनाही बोलावणे आलेले असते. विश्वामित्र व वसिष्ठ पुन्हा समोरासमोर येतात. पुन्हा त्या दोघांमध्ये संघर्ष होतो. विश्वामित्र या बळी देण्याच्या पद्धतीला विरोध करतात व शुन:शेपाचा पुत्र म्हणून स्वीकार करतात.

विश्वामित्रांच्या आश्रमात अनेक शिष्य अभ्यासासाठी आले होते. त्यातील गालव त्यांच्या आवडीचा शिष्य होता. गालव गुरूदक्षिणा मागण्याचा हट्ट विश्वामित्रांकडे करतो. त्यावेळी आठशे अश्वमेधी अश्वांची मागणी ते करतात व त्या अश्वांची मागणी पूर्ण करण्यासाठी गालवाला माधवीचा तीनदा विनिमय करावा लागतो. माधवीच्या या अवस्थेला विश्वामित्र जबाबदार असतात. त्यामुळे त्यांची घुसमट सुरू असते. त्याचबरोबर त्यांची पत्नी शीलवतीही त्यांच्या या निर्णयाने संतुष्ट नसते. विश्वामित्रांवर रागावून ती आश्रम सोडून कान्यकुब्जला जाते. अशाप्रकारे विश्वामित्रांना क्षणाक्षणाला संघर्ष करावा लागत होता.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# संदर्भ सूची


१) स्त्री साहित्याचा मागोवा,
खंड दुसरा,
१९५१ ते २०००.

२) सकाळ : सप्तरंग,
९ सप्टेंबर २००७,
पृ.क्र. ७.

३) देशपांडे संध्या,
अश्‍वदा, मेनका प्रकाशन, पुणे,
आवृत्ती पहिली, २००६,
पृ.क्र. ९.

४) तत्रैव पृ.क्र. ३५.

५) तत्रैव पृ.क्र. ४०.

६) सकाळ : सप्तरंग,
९ सप्टेंबर २००७,
पृ.क्र. ७.

७) देशपांडे संध्या,
अश्‍वदा,
उनि, पृ.क्र. २४०.

८) तत्रैव पृ.क्र. २४०.

९) तत्रैव पृ.क्र. २४०.

१०) तत्रैव पृ.क्र. २४४.

११) तत्रैव पृ.क्र. ५९.

१२) तत्रैव पृ.क्र. ७२.

१३) तत्रैव पृ.क्र. २७.

१४) तत्रैव पृ.क्र. २७.

१५) तत्रैव पृ.क्र. ६१.

१६) तत्रैव पृ.क्र. ६८.

१७) तत्रैव पृ.क्र. ६९.

१८) तत्रैव पृ.क्र. २२, २३.

१९) तत्रैव पृ.क्र. ४६, ४७.

२०) तत्रैव पृ.क्र. १८०, १८१.

२१) तत्रैव पृ.क्र. १८६.

२२) तत्रैव पृ.क्र. १८८.

२३) तत्रैव पृ.क्र. ८४.

२४) तत्रैव पृ.क्र. १६३.

२५) भिडे श्री. र.,
महाभारताचे वरदान,
राजहंस प्रकाशन, पुणे,
खंड-एक, प्रथमावृत्ती, १९९५.
पृ.क्र. ३५५, ३५६.

२६) देशपांडे संध्या,
अश्वदा,
उनि, पृ.क्र. १५५.

२७) तत्रैव पृ.क्र. ३४, ३५.

२८) तत्रैव पृ.क्र. ४४.

२९) तत्रैव पृ.क्र. १९५.

३०) तत्रैव पृ.क्र. १९६.

३१) तत्रैव पृ.क्र. २५२.

३२) तत्रैव पृ.क्र. २५२.

३३) तत्रैव पृ.क्र. २५५.

३४) तत्रैव पृ.क्र. २५५.

३५) तत्रैव पृ.क्र. ६१.